# महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित
## दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगाव (पूर्व), मुंबई-४०००६५.

क्रमांक: कलागारे-२०२६/संकीर्ण/मा.का./१५४
दिनांक: १७ जुलै, २०२६

## परिपत्रक

**विषय: मानक कार्यप्रणाली (SOP) प्रसिध्द करणेबाबत.**

चित्रनगरीतील चित्रीकरण सेवा अधिक सुलभ, पारदर्शक आणि दर्जेदार करण्यासाठी 'कलागारे' विभागाची नवीन मानक कार्यप्रणाली (SOP) तयार करण्यात आली आहे. चित्रनगरीतील सर्व कलागारे, बाह्य चित्रीकरण स्थळे तसेच संपूर्ण परिसर यामध्ये सुसूत्रता आणणे हा या SOP चा मुख्य उद्देश आहे. सदरील मानक कार्यप्रणाली (SOP) या परिपत्रकासोबत जोडण्यात आली असून, सदर मानक कार्यप्रणाली हे परिपत्रक जारी झाल्याच्या दिनांकापासून लागू करण्यात येत आहे.

(मा. व्यवस्थापकीय संचालक यांच्या मान्यतेने)

(सं. पुं. खामकर)
व्यवस्थापक कलागारे

सोबत : मानक कार्यप्रणालीची प्रत

प्रती,
१) प्रशासन विभाग
२) लेखा विभाग
३) अभियांत्रिकी स्थापत्य विभाग
४) विद्युत विभाग
५) मालमत्ता विभाग
६) सुरक्षा विभाग
७) जनसंपर्क विभाग
८) कार्यक्रम विभाग
९) भांडार विभाग

प्रत : माहितीसाठी सादर.
१) मा. व्यवस्थापकीय संचालक यांचे स्वीय सहाय्यक
२) सह व्यवस्थापकीय संचालक यांचे स्वीय सहाय्यक

परिपत्रक क्रमांक: कलागारे-२०२६/संकीर्ण/मा.का./१५४, दिनांक १७ जुलै, २०२६

# मानक कार्यप्रणाली (SOP)

# महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्या. (MFSCDCL)


दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगाव (पूर्व), मुंबई-४०० ०६५

दूरध्वनी क्रमांक ०२२ ६९३०९८५०/६९३०९८३३


(दिनांक १७ जुलै, २०२६ पासून अंमलात येत आहे.)

अनुक्रमणिका


| अ.क्र. | विषय | पृष्ठ क्र. |
| --- | --- | --- |
| | प्रस्तावना व महामंडळाची भौगोलिक स्थिती व सुरक्षा नियमावलीची आवश्यकता | १ |
| १ | व्याख्या | २ |
| २ | सुरक्षा नियंत्रण व्यवस्था | २ |
| ३ | प्रवेश नियंत्रण | ३ |
| ४ | आकस्मिक / नैसर्गिक व इतर दुर्घटनांच्या वेळी करावयाची कार्यवाही | ८ |
| ५ | अनधिकृत बांधकाम | १२ |
| ६ | नियंत्रण कक्षातून सीसीटीव्ही निरीक्षण | १३ |
| ७ | अग्निसुरक्षा आणि आपत्कालीन कार्यपद्धती | १४ |
| ८ | सेट बांधकाम परवानगी आणि साहित्य व्यवस्थापन | १६ |
| ९ | सर्वसमावेशक कचरा व्यवस्थापन नियमावली | १९ |
| १० | चित्रिकरण पूर्ण झाल्यानंतरची कार्यवाही | २० |
| ११ | सर्व साधारण नियम | २० |
| १२ | निर्मिती संस्थेच्या सर्वसाधारण जबाबदाऱ्या | २२ |
| १३ | अंतिम अधिकार | २२ |
| १४ | अनाधिकृत प्रवेश केलेली वाहने व दंडाची रक्कम (परिशिष्ट-१) | २३ |
| १५ | महत्वाचे दूरध्वनी क्रमांक (परिशिष्ट-२) | २४ |
| १६ | शुल्क आकारणीचे वेळापत्रक (परिशिष्ट-३) | २५ |
| १७ | दंड आणि ठेवींची अनुसूची (परिशिष्ट-४) | २६ |
| १८ | बुकिंग रद्द करण्याचे धोरण (परिशिष्ट-५) | २७ |
| १९ | अन्न औषध प्रशासनाचे पत्र व त्यांची SOP (परिशिष्ट-६) | २८ ते ३१ |

## महामंडळाच्या अंतर्गत सुरक्षा व्यवस्थेबाबत नियमावली

प्रस्तावना :- सिनेमा, नाट्यकला, लोककला, संगीतनृत्य आणि इतर प्रयोगनिष्ठ कला यांच्या वाढीस गती देणे तसेच मराठी चित्रपटांचा विकास करण्यासाठी निर्मिती, वितरण व प्रदर्शन यासाठी सहाय्य करण्याची उद्दिष्ट्ये समोर ठेवून सन १९७७ साली महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्या. महामंडळाची स्थापना केली आहे. महामंडळाचा परिसर सुमारे ५२१ एकर इतका असून सद्यस्थितीत महामंडळाच्या परिसरात १६ कलागारे व सुमारे ७४ पेक्षा अधिक बाह्यचित्रिकरण स्थळे आहेत.

चित्रनगरीमध्ये २४ तास चित्रिकरण चालते याशिवाय महामंडळाच्या परिसरात चित्रिकरणपूर्व व चित्रिकरणानंतरच्या सुविधाही उपलब्ध आहेत. त्यामुळे महामंडळाच्या परिसरात चित्रपटसृष्टीतील अनेक नामवंत कलाकारांसह निर्माते, दिग्दर्शक यांचा वावर असतो. भारतीय समाजातील सर्व वयोगटाच्या व्यक्तींना चित्रपटसृष्टीचे वेगळे आकर्षण आहे. त्यामुळे अनेक पर्यटकांसह देशी-विदेशी पर्यटकांचा कायम वावर असतो. त्यामुळे सुरक्षेच्या दृष्टीकोनातून चित्रनगरीचा परिसर हा संवेदनक्षम आहे.

महामंडळाची भौगोलिक स्थितीः महाराष्ट्र राज्य चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाचा परिसर सुमारे ५२१ एकर इतका असून महामंडळाच्या हद्दीच्या सीमेलगत संजय गांधी राष्ट्रीय उद्यान व आरे सारखा जंगलमय भाग असून काही सीमावर्ती भागात हबाले पाडा, नागरमोडी पाडा, माळीनगर, मद्रासपाडा, मोराचा पाडा, देवीचा पाडा हे आदिवासी पाडे/झोपडपट्ट्या आहेत. याशिवाय अंतर्गत भागात गौतमनगर ही झोपडपट्टी आहे.

चित्रनगरीचा संवेदनक्षम परिसर विचारात घेऊन सुरक्षा व्यवस्थेच्यादृष्टीने प्रभावी उपाययोजना सुचविण्यासाठी पोलिस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्यामार्फत सुरक्षा परिक्षण करुन घेण्यात आले आहे. परिक्षणाअंती करण्यात आलेल्या शिफारसीच्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यात आल्या आहेत. त्या अनुषंगाने दादासाहेब फाळके चित्रनगरी परिसरातील सुरक्षितता, आग प्रतिबंध, निवारण आणि आपत्कालिन प्रतिसाद, मालमत्ता, कलात्मक संपत्ती आणि पर्यावरणाचे संरक्षण यासाठी एक मानक कार्यप्रणाली (SOP) निश्चित करण्यात येत आहे. सदर मानक कार्यप्रणाली महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ लिमिटेडचे कर्मचारी, निर्मिती संस्था, कलाकार, कर्मचारी, विक्रेते, कंत्राटदार आणि अभ्यागत यांच्यासह सर्व व्यक्तींना लागू असेल.

i) संरक्षक भिंत :- महामंडळाच्या सीमावर्ती भाग हा वन विभाग तसेच आरेच्या परिसराशी लागून आहे. तथापि, काही भागातील सीमारेषेबाबत वाद असल्याने त्या भागात तसेच काही भागात झोपडपट्ट्या । पाडे येथील रहिवाशांनी केलेले अतिक्रमणांमुळे संरक्षक भिंत सर्व भागात बांधण्यास मर्यादा आहेत असे असले तरी सद्यस्थितीत ८ फुट उंची व त्यावर ५ फुट उंचीचे तारेचे कुंपण असे एकूण २५०० मी. संरक्षक भिंत आहे.

ii) सीसीटिव्ही कॅमेरे :- महामंडळाच्या परिसरात सद्यस्थितीत सी सी टी व्ही कॅमेरे कार्यरत आहेत, सदर कॅमे-यांचे निरिक्षण सुविधा मा. व्यवस्थापकीय संचालक, सह व्यवस्थापकीय संचालक व मुख्य सुरक्षा अधिकारी यांचे कार्यालय तसेच गेट नं. २ येथील नियंत्रण कक्ष येथे उपलब्ध असून तेथून निरिक्षण करण्यात येते.

iii) अनाधिकृत बांधकामास प्रतिबंध करण्यासाठी दक्षता पथकाची स्थापना: महामंडळ परिसरात अनाधिकृत बांधकाम रोखण्यासाठी व त्याची माहिती मिळणेकरीता वेळोवेळी निरीक्षण करण्यात येते व त्याद्वारे दिसून आलेल्या अनाधिकृत बांधकामांवर त्वरीत कारवाई करण्यात आली आहे.

iv) दंडाच्या रक्कमेत वाढ :- महामंडळाच्या परिसरात अनाधिकृतरीत्या प्रवेश करणाऱ्या व्यक्ती व वाहनधारकांकडून आकारण्यात येणाऱ्या दंडाच्या रक्कमेत कार्यालयीन आदेश क्र. आस्थापना/सुरक्षा-२०२०/प्र.क्र.२४/३१५, दि. १८.०८.२०२० च्या परिपत्रकान्वये दुप्पटीने वाढ करण्यात आली आहे. (परिशिष्ट पृ.क्र.२३)

सुरक्षा नियमावलीची आवश्यकता : - महामंडळाच्या अंतर्गत सुरक्षा व्यवस्थेसाठी महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाची सुरक्षा व्यवस्था करार पद्धतीने घेण्यात आली आहे. महामंडळाच्या परिसराची जंगलमय भौगोलिक स्थिती व वन्य प्राण्यांचा असणारा वावर आणि त्यामुळे घडणाऱ्या घटना तसेच महामंडळाच्या सीमावर्ती तसेच अंतर्गत भागात असलेल्या झोपडपट्टी / पाडयांमधील रहिवासी यांच्याकडून असणारा अतिक्रमणाची शक्यता तसेच चित्रपट निर्मिती व त्याच्याशी संबंधित व्यवसायातील स्पर्धात्मक वातावरणामुळे होणारे वाद-विवाद यास प्रतिबंध घालणे अथवा त्यावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. यास्तव सद्यस्थितीत करण्यात येणाऱ्या कार्यवाहीत सुसुत्रता आणण्याची आवश्यकता विचारात घेऊन पुढीलप्रमाणे सर्वंकष नियमावली विहित करण्यात येत आहे.

१. व्याख्या :-

अ) अधिकृत प्रवेश :- महामंडळामध्ये अधिकृतरित्या प्रवेश करण्यासाठी २ प्रवेशद्वारे आहेत, त्यापैकी मुख्य प्रवेशद्वार (गेट नं. १) हे सर्वांसाठी सर्वकाळ खुले आहे. मात्र दुसरे प्रवेशद्वार (एन.एफ. गेट) हे फक्त अत्यावश्यक सेवेतील वाहने, रुग्णवाहीका व मा. व्यवस्थापकीय संचालकांनी तात्पुरत्या स्वरुपात अनुमती दिलेली वाहने यांनाच प्रवेश दिला जातो. तसेच या प्रवेशद्वारातून वैध प्रवेशपत्रासह कलाकार, कामगार यांना वाहनाशिवाय दिला जाणारा प्रवेश अधिकृत प्रवेश समजण्यात यावा.

ब) अनधिकृत प्रवेश :- महामंडळाच्या सीमावर्ती भागात असलेल्या झोपडपट्ट्यांच्या लगतच्या भागातून ज्या ठिकाणी संरक्षक भिंत बांधण्यात आलेली नाही त्या ठिकाणाहून अवैध मार्गाने केला जाणारा प्रवेश तसेच वैध प्रवेशपत्राशिवाय केला जाणारा प्रवेश अनाधिकृत प्रवेश समजण्यात यावा.

क) नियंत्रण कक्ष :- गेट नं. २ येथील सुरक्षा कार्यालय हे नियंत्रण कक्ष असून ते २४ तास कार्यान्वित राहिल व त्यावर माहिती व मदतीसाठी संपर्क साधता येईल, तेथे शिफ्ट इंचार्ज किंवा कर्तव्य सुरक्षा अधिकारी/ रक्षक सतत उपलब्ध असतील. नियंत्रण कक्षाचा मोबाईल क्र. ९९२००११९४० असा असून त्याची माहिती सर्वांना दिली जाईल.

२. सुरक्षा नियंत्रण व्यवस्था :-

मुख्य सुरक्षा अधिकारी यांनी महामंडळाचा परिसर, अनाधिकृत प्रवेश केल्या जाण्याची शक्यता असलेली ठिकाणे, दोन गटात तणाव निर्माण होण्याची कारणे व ठिकाणे, अनाधिकृत बांधकामांची शक्यता, सुलभ वैध प्रवेश प्रक्रिया, चित्रिकरणादरम्यान चित्रिकरणास कोणत्याही कारणास्तव व्यत्यय न येण्यासाठी घ्यावयाची खबरदारी,

चित्रिकरणादरम्यान विविध संघटनांकडून करण्यात येणारी संभाव्य निदर्शने, आगामी काळातील चित्रिकरण / कार्यक्रम विचारात घेऊन सुरक्षा रक्षकांची आवश्यक त्या जागी नियुक्ती करण्याची नियमितपणे दक्षता घ्यावी.

निश्चित करण्यात आलेल्या स्थळांच्या व त्या ठिकाणी नियुक्त केल्या जाणाऱ्या सुरक्षा रक्षकांच्या संख्येबाबत किमान दर सात दिवसांनी अथवा आवश्यकता भासेल त्यावेळेस आढावा घेऊन आवश्यकतेप्रमाणे सुरक्षा रक्षकांचे स्थान व संख्या निश्चित करावी. तसेच सुरक्षा व्यवस्था पुरविणाऱ्या संस्थेशी समन्वय साधून करारनाम्यातील तरतूदीप्रमाणे पुरेसे व सक्षम सुरक्षा रक्षकांची उपलब्धता राहिल, याबाबत दक्षता घेण्यात यावी.

i) सुरक्षा नियंत्रण समिती सदर समिती खालीलप्रमाणे असेल :-

| | |
|---|---|
| १. मा. व्यवस्थापकीय संचालक - | अध्यक्ष |
| २. सह व्यवस्थापकीय संचालक - | सह अध्यक्ष |
| ३. सर्व विभाग प्रमुख - | सदस्य |
| ४. मुख्य सुरक्षा अधिकारी - | सदस्य सचिव |

ii) नियमित अहवाल:-

१. मा. व्यवस्थापकीय संचालक हे सुरक्षा व्यवस्थेचा त्रैमासिक आढावा घेतील.

२. सह व्यवस्थापकीय संचालक हे सुरक्षा व्यवस्थेचा मासिक आढावा घेतील.

३. मुख्य सुरक्षा अधिकारी हे सुरक्षा व्यवस्थेचा साप्ताहिक अहवाल सह व्यवस्थापकीय संचालक यांना प्रत्येक महिन्याच्या १ तारखेला किंवा १ तारखेला सुट्टी असल्यास त्यानंतरच्या लगतच्या कार्यालयीन दिवशी सादर करतील. तसेच मुख्य सुरक्षा अधिकारी सर्व सुरक्षा यंत्रणेवर दैनंदिन संनियंत्रण ठेवतील.

३. प्रवेश नियंत्रण

महामंडळाच्या परिसरात सुरक्षा व्यवस्थेच्या संदर्भात प्रश्न उपस्थित करणाऱ्या घटनांचे कारणांचे स्वरुप पुढीलप्रमाणे आहे.

१) महामंडळाचा परिसर व त्या लगतचा भाग हा जंगलव्याप्त आहे. तसेच नजीकच्या भागात तुळशी व विहार ही मुंबईस पाणीपुरवठा करणारी तलावे आहेत. चित्रनगरीचा परिसर हा शहराच्या मध्यवर्ती भागात असला तरी वन्य प्राण्यांना त्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने व उपजीविकेच्या दृष्टीने योग्य जागा आहे. त्यामुळे या परिसरात वन्य प्राण्यांचा कायम वावर असतो, वन्य प्राण्यांनी मानवावर हल्ले केल्याची तसेच अवैधरित्या मानवानेही त्यांच्यावर हल्ला केल्याच्या घटना घडलेल्या आहेत,

२) चित्रनगरीचा परिसर जंगलव्याप्त असल्याने उन्हाळयामध्ये गवत वाढल्यामुळे शुल्लक मानवी निष्काळजीपणामुळे छोटया-मोटया आगी लागण्याचे प्रकार नियमितरीत्या घडत असतात,

३) चित्रनगरीमध्ये चित्रिकरणाच्या अनुषंगाने सेट उभारणे तोडणे यासाठी लागणारे साहित्य, कुशल/अकुशल मजूर आवश्यक असतात, या बाबींचा पुरवठा करण्यासाठी संबंधित कंत्राटदारांमध्ये व्यावसायिक स्पर्धा असते. या

स्पर्धेमुळे काम मिळवण्यासाठी आप-आपसांत वाद झाल्याचे व त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्याच्या घटना घडलेल्या आहेत.

४) महामंडळाच्या परिसरात ७ आदिवासी पाडे / झोपडपट्टयांमध्ये रहिवासी राहत असून त्यांच्यातील अंतर्गत वाद विकोपास गेल्यामुळे मारहाणीच्या घटना घडलेल्या आहेत.

५) महामंडळाच्या परिसरात झोपडपट्टी असून तेथील रहिवाशांकडून वारंवार अनाधिकृत बांधकाम करण्याचा प्रयत्न केला जातो,

६) महामंडळात दररोज सुमारे ३ ते ४ हजार लोकांची ये-जा असून ती त्यांची वैयक्तिक वाहने, बेस्ट बस, रिक्षा, टॅक्सी याद्वारे चित्रनगरीत प्रवेश करतात. यादरम्यान रस्ते अपघात झाल्याच्या घटना नोंदविल्या गेल्या आहेत.

सदर घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी प्रवेश नियंत्रण करणे आवश्यक आहे.

अ) प्रवेश नियंत्रण (व्यक्ती)

महामंडळात प्रवेश अथवा निर्गमनासाठी फक्त मुख्य प्रवेशद्वार म्हणजेच गेट नं. १ चाच वापर करण्यात येईल. एन.एफ. गेटचा उपयोग फक्त अत्यावश्यक सेवा व व्यवस्थापकीय संचालक यांनी मान्यता दिलेल्या अपवादात्मक प्रसंगी करण्यात येईल. महामंडळाच्या परिसरात प्रवेश करणाऱ्या व्यक्तीचे प्रकार व संख्या विचारात घेऊन प्रवेश देण्यासंदर्भात पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी:-

| क्र. | प्रवेश करणाऱ्यांचे प्रकार | तपासावयाची वैधता | ओळखपत्र /प्राधिकृतता | वैध कालावधी | सुरक्षा विभागाने करावयाची कार्यवाही | इतर आवश्यक कार्यवाही |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पाडयांमधील रहिवाशी | रहिवाशीचा पुरावा म्हणून आधारकार्ड, पॅनकार्ड, रेशनकार्ड | -- | -- | | |
| २ | पाड्यांमधील रहिवाशी यांचे पाहूणे | ओळख पटविण्यासाठी आधारकार्ड, पॅनकार्ड, | | | संबंधीतांशी संपर्क साधून खातरजमा झाल्यानंतर प्रवेश देण्यात यावा | |
| ३ | चित्रनगरी परिसरातील कार्यालये<br>१.चित्रनगरी महामंडळ<br>२. व्हिसलिंग वुड<br>३. माया डिजिटल कॉसमॉस<br>४. प्राईम फोकस<br>५. बी.एन.एच.एस.<br>६. पी.डी.आर. | संबंधीत कार्यालयांनी दिलेले ओळखपत्र | ओळखपत्र देण्यासाठी प्राधिकृत असलेले कार्यालय प्रमुख | ओळखपत्रात नमूद केल्याप्रमाणे | | |
| ४ | इतर शासकीय यंत्रणेच्या अधिकारी कर्मचारी कार्यालयीन | संबंधीत कार्यालयाचे ओळखपत्र व | संबंधीत कार्यालय प्रमुख | १ दिवसासाठी | स्वतंत्र नोंदवहीत नोंद घ्यावी. | सुरक्षा विभाग |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | कामासाठी | महामंडळात प्रवेशासाठीची कारणाबाबतचे कागदपत्रे | | | | |
| ५ | शासकीय पाहुणे, अन्य पाहुणे, शासकीय शिष्ट मंडळ यांची चित्रनगरीस भेट | ओळख पटविणारी कागदपत्रे उदा. पॅनकार्ड, आधारकार्ड, कार्यालयाचे स्वत:चे ओळखपत्र | जनसंपर्क विभाग | १दिवसासाठी | इतर शासकीय यंत्रणेतील प्रवेश करणाऱ्या अधिकाऱ्यांसाठी स्वतंत्र नोंदवही ठेवण्यात यावी. | सुरक्षा विभागाने तात्काळ याबाबत जनसंपर्क विभागामार्फत वरिष्ठ अधिकाऱ्यास अवगत करावे. |
| ६ | चित्रिकरण स्थळांवर येणारे निर्मिती संस्थेचे कलाकार / कामगार, अभ्यागत व इत्तर | निर्मिती संस्थेने दिलेले ओळखपत्र / पत्र / ई संदेश | निर्मिती संस्थेने प्राधिकृत केलेल्या व्यक्तीची सही व महामंडळाचा शिक्का | प्राधिकृत केल्याप्रमाणे | १. मुख्य सुरक्षा अधिकारी त्यानुसार यांनी आरक्षण कालावधी विचारात घेऊन ओळखपत्रे द्यावीत.<br>२. स्वतंत्र नोंदवही ठेवावी | १. निर्मिती संस्थेने यासाठी जबाबदार व्यक्ती प्राधिकृत करुन त्याप्रमाणे महामंडळाच्या कलागारे नियंत्रण कक्षास पत्राने / ई संदेशाद्वारे कळविणे आवश्यक.<br>२. संस्थेनिहाय ओळखपत्राचा रंग निश्चित करण्यात आला आहे. |
| ७ | बाह्ययंत्रणेद्वारे महामंडळात कार्यरत कर्मचारी | नियोक्त्याने दिलेले ओळखपत्र | नियोक्त्याने प्राधिकृत केलेल्या प्राधिकाऱ्याची सही शिक्का व महामंडळाचा शिक्का | ओळखपत्रावर नमूद करण्यात आल्याप्रमाणे | -- | कंत्राटदाराने प्राधिकृत व्यक्तीचा तपशिल महामंडळास देणे आवश्यक |
| ८ | मान्यताप्राप्त चित्रपट युनियन पदाधिकारी | संबंधीत संघटनेचे ओळखपत्र व Vigilence Team मधील सदस्य म्हणून शिफारस | संघटना प्रमुखाच्या सही-शिक्क्यानिशी | प्राधिकृत केल्याप्रमाणे | संबंधीत संघटनेच्या प्रतिनिधींची परिसरात प्रवेश करण्याची कारणमिमांसा विचारात घेऊन कायदा व सुव्यवस्था किंवा चित्रिकरणास बाधा येणार नाही याची दक्षता घ्यावी. | संबंधीत संघटनांनी त्यांच्या Vigilence Team चे सदस्य म्हणून नावे कळविणे आवश्यक |
| ९ | ऑडिशन / ऑडियन्स | संबंधीत निर्मिती संस्थेचे पत्र | संबंधित निर्मिती संस्थेचे पत्र व प्रवेशकर्त्याची | प्राधिकृत केल्याप्रमाणे | चित्रिकरणास बाधा येणार नाही याची दक्षता घ्यावी | सुरक्षा विभाग |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | ओळख पटविण्यासाठी आधारकार्ड, पॅनकार्ड इ. | | | |
| १० | रेकी | निर्मिती संस्थेचे पत्र /संबंधितांचे ओळखपत्र/ संबंधिताने कलागारे नियंत्रण कक्षास पाठविलेले पत्र / ई संदेश | कलागारे नियंत्रण कक्ष | प्राधिकृत केल्याप्रमाणे | कलागारे विभागाशी संपर्क साधून खात्तरजमा करणे. | सुरक्षा / कलागारे विभाग |

ब) प्रवेश नियंत्रण (वाहने)

| क्र. | प्रवेश करणाऱ्या वाहनाचे प्रकार | तपासावयाची वैधता | ओळखपत्र प्राधिकृतता | वैध कालावधी | सुरक्षा विभागाने करावयाची कार्यवाही | इतर आवश्यक कार्यवाही |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | अत्यावश्यक सेवेची वाहने | | | | | |
| २ | निर्मिती संस्थेचे साहित्य आणण्यासाठी येणारी वाहने, व्हॅनीटी व्हॅन, जनरेटर, जेसीबी. पोकलँड, डम्पर | निर्मिती संस्थेने वाहन क्रमांक व वाहन चालकाच्या नावासह आगाऊ दिलेले पत्र, महामंडळाने दिलेले वाहन प्रवेशपत्र | निर्मिती संस्थेने प्राधिकृत केलेल्या व्यक्तीची सही व महामंडळाचा शिक्का | -- | वाहन क्रमांक व वाहन चालक यांची शिफारस केलेली वाहनेच सोडण्यात यावी. | सुरक्षा विभाग |
| ३ | खासगी प्रवासी वाहने | उपरोक्त 'अ' येथील विवरणपत्रानुसार वैध प्रवेशकर्ता महामंडळाने दिलेले वाहन प्रवेशपत्र | अ येथील विवरणपत्राप्रमाणे | | सदर वाहनात वैध प्रवासी प्रवास करत असल्यास वाहनास प्रवेश द्यावा | |
| ४ | बॉलिवुड टुर | सेवा पुरवठादारा कडून देण्यात येणारे तिकीट / प्रवेशपत्र | -- | -- | -- | सुरक्षा विभाग |
| ५ | शुटींग करता आणण्यात येणारे जनावरे बैल गाडी, घोडे | निर्मिती संस्थने वाहन क्रमांक व वाहन चालकाच्या नावासह आगाऊ दिलेले पत्र / संबंधित विभागाची परवानगी | | | i)ॲनिमल वेल्फेअर बोर्ड यांची परवानगी ii) आवश्यकते नुसार सोबत पशुवैद्यकीय अधिकारी असल्याची खात्री करणे | सुरक्षा व कलागारे विभाग |

क) वितरीत करण्यात येणाऱ्या प्रवेशपत्रांचे नमुने :-

वैयक्तिक प्रवेशपत्र

**पुढील बाजू**

ओळखपत्र क्र.

फोटो

ओळखपत्र धारकाचे नाव

पद

निर्मिती संस्था

लोकेशन

गाडी क्र.

वैध कालावधी :-

| निर्मिती संस्थेच्या व्यवस्थापकाचे नाव व सही (मोबाईल क्र.) | न.रु.अ. यांची सही |
|---|---|
| | |

**मागील बाजू**

1) सदर ओळखपत्र हे अहस्तांतरणीय आहे.
2) सदर ओळखपत्र हे फक्त चित्रनगरी प्रवेशासाठी वैध राहील.
3) ओळखपत्राचा वैधता कालावधी समाप्त झाल्यानंतर ओळखपत्र महामंडळास परत करण्याची जबाबदारी संबंधित निर्मिती संस्थेची राहील.
4) ओळखपत्र परत न केल्यास होणाऱ्या संभाव्य परिणामाची जबाबदारी संबंधित निर्मिती संस्थेची राहील.
5) ओळखपत्राचा गैरवापर केल्यास दंडात्मक कारवाई करण्यात येईल चित्रनगरी प्रवेश कायमस्वरुपी बंद करण्यात येईल

ड) वाहन पास नमुने

दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगाव

"फक्त कर्मचाऱ्यांसाठी"

वाहन क्र. : ................................

प्रवेशपत्र क्र.................................

कालावधी : .......... ते ..........

दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगाव

"निर्मिती संस्था"

वाहन क्र. : ................................

प्रवेशपत्र क्र.................................

कालावधी : .......... ते ..........

**दादासाहेब फाळके चित्रनगरी**
**गोरेगाव**
(वाहन प्रवेश पत्र)

**"तात्पुरता पास"**

वाहन प्रवेशपत्र क्र.:

**दादासाहेब फाळके चित्रनगरी**
**गोरेगाव**
(वाहन प्रवेश पत्र)

**" पर्यटक पास"**

वाहन प्रवेशपत्र क्र.:

**दादासाहेब फाळके चित्रनगरी**
**गोरेगाव**
(वाहन प्रवेश पत्र)

**"अभ्यागत पास"**

वाहन प्रवेशपत्र क्र.:

**दादासाहेब फाळके चित्रनगरी**
**गोरेगाव**
(वाहन प्रवेश पत्र)

**" माल वाहू वाहनांसाठी "**

वाहन प्रवेशपत्र क्र.:

इ) अनाधिकृत प्रवेश प्रतिबंधात्मक उपाययोजना :-

संबधित सुरक्षा रक्षक (मुख्य सुरक्षा अधिकारी यांच्या निदर्शनास आणावी)

↓

मुख्य सुरक्षा अधिकारी (दंड आकारणी)

↓

मुख्य सुरक्षा अधिकारी (म.पो.का.. कलम १२० व १२२ प्रमाणे कार्यवाही)

↓

दलालांच्या संदर्भात मुख्य सुरक्षा अधिकारी
१. दलालांची माहिती संग्रहीत करुन पोलिस ठाण्यास देणे
२. पर्यटकास पोलिस ठाणे येथे तक्रार देण्यासाठी प्रवृत्त करणे,

i) अनधिकृत प्रवेशाची प्रकरणे संबंधित सुरक्षा रक्षकांनी यंत्रणेच्या प्रभारी सुरक्षा अधिकारी / मुख्य सुरक्षा अधिकारी यांच्या निदर्शनास आणावी.

ii) अनधिकृतरीत्या प्रवेश केलेल्या पर्यटकांकडून व वाहनचालकांकडून महामंडळाच्या नियमानुसार दंड आकारणी करण्यात यावी. (परिशिष्ट पृ.क्र. २३)

iii) दंड भरण्यास असमर्थता दर्शविल्यास पोलिसांमार्फत महाराष्ट्र पोलिस कायदा कलम १२० व १२२ प्रमाणे कार्यवाही करावी.

iv) चित्रनगरी पाहण्यासाठी व कलाकारांसोबत फोटो काढून देण्याचे आमिष दाखवून लोकांकडून पैसे घेऊन छुप्यामार्गाने व वाहनाने चित्रनगरीत प्रवेश देणाऱ्या दलालांची माहिती संग्रहीत करुन स्थानिक पोलिस स्टेशनकडे पुराव्यासह तक्रार दाखल करावी,

v) फसवल्या गेलेल्या पर्यटकास पोलिस ठाणे येथे तक्रार देण्यासाठी प्रवृत्त करावे.

vi) अनाधिकृत पार्क केलेली वाहने टोइंग व्हॅनने निश्चित केलेल्या ठिकाणी हलवावे व दंडात्मक कार्यवाही करावी

४. आकस्मिक / नैसर्गिक व इतर दुर्घटनांच्या वेळी करावयाची कार्यवाही :-

अ) आगीच्या घटना :-

- लग्न/विजयी मिरवणूक, अग्नी संस्कार, बॉम्बस्फोट शोभेचे दारुकाम व इतर अनुषांगिक प्रसंगांचे चित्रिकरण करण्यासाठी चित्रिकरणामध्ये दारुगोळा व इतर ज्वलनशील पदार्थाचा वापर करण्यात येतो. या प्रसंगांचे चित्रिकरण असल्यास कलागारे विभाग व सुरक्षा विभाग यांची एकत्रित परवानगी आवश्यक असून सुरक्षा विभाग या संदर्भात पुढील कार्यवाही करेल.
- अशा चित्रिकरणासाठी अग्निशमन दलाचे ना हरकत प्रमाणपत्र आवश्यक आहे. सदर परवानगी घेण्यात आल्याबाबतची तसेच आग प्रतिबंधक उपाययोजना निर्मिती संस्थेने केली असल्याबाबतची खातरजमा सुरक्षा विभाग तसेच कलागारे विभागाने संयुक्तरित्या करावी.
- चित्रिकरणादरम्यान अथवा चित्रनगरीच्या परिसरातील चित्रिकरण स्थळांवर तसेच जंगल भागात आग लागल्यास पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी :-


| | |
|---|---|
| *नजीकचा सुरक्षा रक्षक*<br>*घटनास्थळी भेट देऊन आगीच्या स्वरुपाचा अंदाज घ्यावा.*<br>↓<br>*आगीचे स्वरुप विचारात घेऊन तात्काळ वीज पुरवठा बंद करण्याची कार्यवाही.*<br>↓<br>*सुरक्षा नियंत्रण कक्षास अवगत करणे.*<br>↓<br>*सुरक्षा नियंत्रण कक्ष*<br>*१. आवश्यकतेनुसार घटनास्थळी सुरक्षा रक्षकांची कुमक वाढवावी.*<br>*२. आग आटोक्यात आणण्यासाठी अग्निशमन बंबाच्या सहाय्यासाठी अग्निशमन दलास पाचारण करावे.*<br>*३. दिंडोशी अग्निशमन दल दूरध्वनी क्र.२८४०६७२९*<br>*४. स्थानिक पोलिस स्टेशन व महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना कळवावे.*<br>*५. बाधित लोकांना सुरक्षित ठिकाणी हलवावे. जखमींना उपचारासाठी पाठवावे.* | i) नजीकच्या स्थळावरील (Point) सुरक्षा रक्षकाने माहिती मिळताच तात्काळ घटनास्थळी भेट देऊन आगीच्या स्वरुपाचा अंदाज घ्यावा,<br>ii) आग पसरु नये म्हणून वीज पुरवठा बंद करावा,<br>१. महामंडळाच्या परिसरात उपलब्ध असलेल्या अग्निशमन बंबाचे सहाय्य घेण्यात यावे, मो.क्र.८०८०१३१७०३, दिंडोशी अग्निशमन दल दूरध्वनी क्र. २८४०६७२९<br>iii) अग्नीशामकांचा वापर आग विझविण्यासाठी करावा.<br>iv) आगीचं स्वरुप विचारात घेऊन अग्नीशमन दलास व स्थानिक पोलिस स्टेशन व महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना कळवावे.<br>v) बाधित लोकांना सुरक्षित ठिकाणी हलवावे, जखमीना उपचारासाठी पाठवावे. |

ब) रस्ते अपघात / चित्रिकरण स्थळावरील अपघातः-

| | |
|---|---|
| *नजीकचा सुरक्षा रक्षक*<br>*घटनास्थळी भेट देऊन अपघाताचे स्वरुपाचा अंदाज घ्यावा. व नियंत्रण कक्षास अवगत करावे.*<br>↓<br>*नियंत्रण कक्ष*<br>*१. आवश्यकतेनुसार घटनास्थळी सुरक्षा रक्षकांची कुमक वाढवावी.*<br>*२. जखमींना वैद्यकीय उपचाराची व्यवस्था करण्यासाठी रुग्णवाहिकेचा वापर (दूरध्वनी क्र.१०८)*<br>↓<br>*स्थानिक पोलिस व महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना कळवावे.* | i) घटनास्थळी भेट देऊन जखमींना वैद्यकीय उपचाराची व्यवस्था करण्यासाठी रुग्णवाहिकेचा वापर करावा. (दूरध्वनी क्र. १०८)<br>ii) स्थानिक पोलिस स्टेशन<br>आरे पोलिस स्टेशन ०२२ २९२७२४८५<br>दिंडोशी पोलिस स्टेशन ०२२ २८७७०७८१<br>व महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना कळवावे. |

क) पाण्यात बुडण्याची घटना:-

महामंडळाच्या परिसरात असलेला तलाव (Lake Location) तसेच परिसरातलगत असलेल्या तुळशी आणि विहार या तलावांकडे महामंडळाच्या परिसरातील जंगली भागातून ये-जा करण्यासाठी पायवाटा चोरवाटा आहेत, त्यामुळे या तलावांमध्ये यापूवी बुडून मरण पावल्याच्या घटना घडल्या आहेत. यास प्रतिबंध करण्यासाठी पुढीलप्रमाणे उपाययोजना करण्यात यावी.




अ) प्रतिबंधात्मक उपाय

i) तलाव किंवा तलावाच्या परिसरात गस्त घालण्यात यावी.

ii) जंगल भागातील पायवाटा चोरवाटा बंद करण्यात याव्यात.

iii) पावसाळयामध्ये तलाव भरल्यानंतर स्थानिक रहिवाशांकडून पोहण्यासाठी किंवा कपडे धुण्याकरीता करण्यात येत असलेल्या वापरास प्रतिबंध करावा,


ब) दुर्घटना घडल्यास करावयाची कार्यवाही

iv) दुर्घटना घडल्यास घटनेची माहिती अग्निशमन दल, स्थानिक पोलिस स्टेशनला तसेच महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना द्यावी,

v) बाधित व्यक्तीस वैद्यकीय उपचारासाठी पाठवावे, (दुरध्वनी क्र. १०८ वरुन रुग्णवाहिका मागवावी.)

ड) शारिरीक अपराधाची घटना:-

चित्रनगरी परिसरातील स्थानिक रहिवासी वस्त्यांमध्ये तसेच चित्रिकरण स्थळांवरही चित्रिकरणासाठी आवश्यक असणाऱ्या सेवा पुरवठादारांमधील स्पर्धेमुळे वाद-विवाद / मारहाणीच्या घटना घडल्या आहेत, या घटनांना प्रतिबंध घालण्यासाठी,





i) महामंडळाच्या परिसरात २४ तास गस्त घालण्यात यावी व कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उद्भवणार नाही याची दक्षता घ्यावी.

ii) स्थानिक पोलिस यंत्रणेशी समन्वय साधून परिसरातील कायदा व सुव्यवस्था अबादित ठेवावी.

iii) वाद-विवाद/मारहाणीच्या घटनांच्या संदर्भात गोपनिय माहिती मिळवून असे प्रसंग टाळण्याचा प्रयत्न करावा यासाठी दोन्हीं गटात सलोख्याचे प्रयत्न करावे किंवा संभाव्य घटनेबाबत स्थानिक पोलिस स्टेशनला आगाऊ माहिती द्यावी.

iv) वाद-विवाद मारहाणीच्या घटना घडल्यास तात्काळ स्थानिक पोलिस स्टेशनला कळवून पुढील कार्यवाही करावी.

**इ) वन्य पशु-प्राण्यांसंदर्भातील घटना:-** चित्रिकरणादरम्यान अनेकदा पशु-प्राण्यांचा वापर केला जातो. चित्रिकरणादरम्यान पशु-प्राण्यांचा अपघात झाल्याच्या घटनाही यापुर्वी घडलेल्या आहेत. तसेच महामंडळाचा परिसर हा जंगलव्याप्त असून लगतच संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाचा परिसर तसेच आरे जंगलमय भाग आहे. तसेच परिसरानजीक तुळशी व विहार हे तलाव असल्याने या परिसरात वन्य प्राण्यांचा वावर असतो. यापुर्वी वन्यप्राण्यांच्या शिकारीच्या घटना तसेच वन्य प्राण्यांनी मानवांवर हल्ले केल्याच्या घटनाही घडल्या आहेत. या घटनांना प्रतिबंध करण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात याव्यात :




A) चित्रिकरणादरम्यानच्या दुर्घटना :-

i) चित्रिकरणासाठी आणण्यात येणाऱ्या प्राण्यांसंदर्भात आवश्यक असलेल्या ॲनिमल वेल्फेअर बोर्डचे प्रमाणपत्राची तपासणी करावी.

ii) प्रमाणपत्रात नमूद केले असल्यास त्याप्रमाणे सोबत पशुवैद्यकीय डॉक्टर असल्याची खात्री करावी.

iii) वरीलप्रमाणे तपासणी करूनच प्राण्यांना प्रवेश देण्यात यावा.

iv) चित्रिकरणादरम्यान पशु-प्राणी यांच्याबाबतीत दुर्घटना घडल्यास याबाबतची माहिती वन विभागास कळवावी.

v) जखमी असलेल्या प्राण्यांस पशुवैद्यकीय दवाखान्यत उपचाराकरीता पाठवावे,

vi) घटनेसंदर्भात जबाबदारी निश्चित करण्यात यावी व त्यानुसार वन विभाग किंवा स्थानिक पोलिस ठाण्यास कार्यवाहीसाठी कळवावे. प्राणी मित्रांचीही मदत घ्यावी.

vii) मृत प्राण्यांसदर्भात घटनास्थळी वन विभाग पंचनामा करतील तत्पुर्वी सदर ठिकाणी कोणतेही फेर-फार करण्यात येणार नाही, याची दक्षता घ्यावी.

B) वन्य प्राण्यांशी निगडीत घटना :-

i ) वन्यप्राण्यांच्या शिकारीच्या घटनांना प्रतिबंध करण्यासाठी सुरक्षा रक्षकांच्या पथकाने चित्रनगरी लगतच्या जंगलामध्ये दैनंदिन गस्त घालून शिकाऱ्यांकडून लावण्यात येणाऱ्या सापळ्यांचा शोध घेऊन ते निकामी करण्यात यावी.

ii) गस्तीदरम्यान आढळून आलेले फासे, गळून पडलेली हरणाची शिंगे व इतर अवशेष कार्यालयात जमा करावीत व त्याबाबत वन विभागास अवगत करावे.

iii) वन्य प्राण्यांच्या हालचालीची नोंद ठेवून संरक्षणाच्यादृष्टीने उपाययोजना करण्यात याव्यात.

iv) वन्य पशूच्या शिकारी संदर्भात घटना गस्ती दरम्यान आढळून आलेल्या संशयिताकडे चौकशी करावी व आवश्यकतेनुसार वन विभागासही अवगत करावे.

(v) वन्य प्राण्यांच्या संरक्षणार्थ देण्यात येणारे प्रशिक्षण अथवा त्या विभागाशी समन्वय साधून सुरक्षा रक्षकांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात यावा.

vi) वन्य प्राणी हे अन्न पदार्थाच्या शोधार्थ मानवी वस्तीत प्रवेश करत असल्याची बाब विचारात घेऊन महामंडळाच्या परिसरात ठेवलेल्या कचराकुंडी व्यतिरिक्त इतरत्र कचरा टाकण्यास प्रतिबंध करावा

C. साप, अजगर किंवा तत्सम वन्य प्राणी सेटवर किंवा रहिवाशी वस्तीत आल्यासः चित्रनगरीत साप अजगर आढळून येतात. ते सेटवर व चित्रिकरण स्थळी आले तर त्यांना तेथुन पकडून जंगलात सोडण्याकरिता प्रशिक्षित सुरक्षा रक्षक/सर्पमित्राची मदत घ्यावी तसेच बीएनएचएस मधील कर्मचाऱ्यांची मदत घ्यावी.

D. भटक्या कुत्र्यांबाबतः - कार्यवाहीसाठी महानगरपालिकेस कळविण्यात यावे.

## ५. अनधिकृत बांधकाम :-

महामंडळाच्या अतंर्गत तसेच सीमावर्ती भागात असलेल्या नागरी वस्तीलगत अतिक्रमण/अनधिकृत बांधकाम केल्याच्या घटना घडत असतात. या घटनांना आळा घालण्यासाठी तसेच करण्यात आलेल्या अनाधिकृत बांधकामासंदर्भात पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल :-

*सुरक्षा विभाग*
*गस्त व टेहळणी करणे*

↓

*सुरक्षा विभाग*
*अनधिकृतपणे नव्याने बांधकाम करणाऱ्या अनधिकृत कॉन्ट्रॅक्टरची माहिती मिळवून मुख्य सुरक्षा अधिकारी यांना कळविणे.*

↓

*मुख्य सुरक्षा अधिकारी*
*बांधकाम थांबवावे व तोड कारवाई प्रक्रिया सुरु करावी.*

↓

*मुख्य सुरक्षा अधिकारी*
*अनाधिकृत बांधकाम होऊ नये किंवा असे बांधकाम आढळून आल्यास मुख्य सुरक्षा अधिकारी यांच्या आदेशान्वये पुढील कारवाई*

i) सुरक्षा विभागाने झोपडपट्टी परिसरात नियमितरीत्या पायी व वाहनाद्वारे गस्त घालावी.
ii) छुप्या मार्गावर टेहळणी करुन बांधकाम साहित्य आणले जाणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.
iii) अनाधिकृत बांधकाम करणारे संस्था/व्यक्ती यांची माहिती संग्रहीत करावी व त्यांचे हालचालीवर लक्ष ठेवून अनाधिकृत बांधकामास प्रतिबंध करावा.
iv) गस्तीदरम्यान नवीन अनाधिकृत बांधकाम होताना किंवा केल्याचे आढळून आल्यास त्याची माहिती त्वरीत मुख्य सुरक्षा अधिकारी यांना द्यावी,

### ५.१ जुनी अनधिकृत बांधकामे:

*अनाधिकृत बांधकाम संदर्भात स्थापत्य विभाग व सुरक्षा विभाग यांनी एकमेकांशी समन्वय ठेवावा.*

↓

*उप अभियंता (स्था.)*
*अतिक्रमणाच्या संदर्भात पोलीस ठाण्यात तक्रार देतील.*

↓

*उप अभियंता (स्था.)*
*व आवश्यकतेनुसार संबंधित संस्थांच्या परवानग्या उदा महापालिका, उपजिल्हाधिकारी (निष्कासन) शासनाचे मार्गदशक नियमावलीचे पालन करुन अनाधिकृत बांधकाम तोडण्याची कारवाई करावी,*

↓

*स्थापत्य विभाग व सुरक्षा विभाग*
*निष्कासनाची कारवाई करण्यात यावी*

i) स्थापत्य विभागाने सुरक्षा विभागाशी समन्वय साधून अनाधिकृत बांधकाम केलेल्या झोपडया/गोदामे व इतर बांधकाम याची निश्चिती करावी.
ii) अनधिकृत बांधकाम तोडण्यासाठी संबंधित संस्थांच्या परवानग्या व नियमावलीप्रमाणे पालन करुन कार्यवाही निश्चित करावी. (महापालिका, उपजिल्हाधिकारी (निष्कासन) व शासनाचे मार्गदशक नियमावलीचे पालन करुन) अनाधिकृत बांधकामाबाबत कार्यवाही करावी.
iii) शासकीय जमिनीवरील अतिक्रमणाच्या संदर्भात महाराष्ट्र शासनाच्या प्रचलित नियमानुसार अभियांत्रिकी विभाग अतिक्रमणाच्या संदर्भात पोलीस ठाण्यास तक्रार देतील.
iv) सुरक्षा विभाग आवश्यक तेथे पोलिसाची मदत उपलब्ध करुन घेईल.
v) अनधिकृत बांधकाम बाबत पडताळणीवेळी व निष्कासन कारवाईवेळी स्थापत्य विभागाचे अभियंता उपस्थित राहतील. आदिवासी पाड्यामधील बांधकाम संदर्भात विशेष दक्षता घेण्यात यावी व नियोजन पूर्वक कायदा व सुव्यवस्था निर्माण न होण्याच्या दृष्टीकोनातून समन्वय ठेवून कारवाई करावी,

६. नियंत्रण कक्षातून सीसीटीव्ही निरीक्षण :-

महामंडळातील सुरक्षा व्यवस्थेवर नियंत्रण ठेवण्यासाठी तसेच सुधारणा करण्याच्या अनुषंगाने उपाययोजना करण्यासाठी महामंडळाच्या परिसरात महत्वाच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरा बसविण्यात आले आहेत. त्याद्वारे करण्यात येणाऱ्या चित्रिकरणाच्या संदर्भात पुढील कार्यवाही:-

*सुरक्षा नियंत्रण कक्ष<br>सीसीटीव्ही कॅमेराद्वारे होणा-या चित्रिकरणाचे निरिक्षण*

↓

*आक्षेपार्ह अवैध घटनांच्या संदर्भात सुरक्षा रक्षक कारवाई करण्यासाठी पर्यवेक्षीय अधिकारी यांना माहिती देतील.*

↓

*पर्यवेक्षीय अधिकारी मदत पाठवतील व स्वतः घटनास्थळी जातील, घटनेच्या गांभिर्यानुसार मुख्य सुरक्षा अधिकारी तसेच इतर यंत्रणा (पोलिस, अग्निशमन) यांना कळवितील*

↓

*मुख्य सुरक्षा अधिकारी हे घटनेबाबत कार्यवाहीसाठी मार्गदर्शन करतील व आवश्यकतेनुसार समक्ष घटनास्थळी भेट देतील,*

↓

*घटनांचे स्वरुप व गांभिर्य विचारात घेऊन व्यवस्थापकीय संचालक आणि सह व्यवस्थापकीय संचालक व संबंधीत विभाग प्रमुख यांना माहिती देतील*

*संबंधीत विभाग प्रमुख<br>केलेल्या कारवाईचा अहवाल व्यवस्थापकीय संचालक आणि सह व्यवस्थापकीय संचालक यांना तात्काळ सादर करावा.*

*मुख्य सुरक्षा अधिकारी हे घटनांच्या चित्रिकरणाचे जतन करील तसेच यांनी मुंबई पोलिस यंत्रणेशीही समन्वय ठेवतील*

i) गेट नं.३ येथे सुरक्षा नियंत्रण कक्ष तसेच सीसीटीव्ही चित्रिकरणाचे निरीक्षण करण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे. सीसीटीव्ही चित्रिकरणाचे निरीक्षण करण्याकरीता २४ तास कालावधीकरीता शिफ्ट निहाय स्वतंत्र सुरक्षा रक्षक नेमण्यात यावेत, तसेच नियंत्रण कक्षातील अन्य हजर पर्यवेक्षक अधिकारी यांनी देखील सदर यंत्रणेची पाहणी व आढावा घ्यावा, सुरक्षा रक्षकांनी प्रत्येक घटना व केलेली कार्यवाही याची नोंद स्वतंत्र रजिस्टर मध्ये घ्यावी.

ii) सीसीटीव्ही चित्रिकरणाचे निरीक्षण करताना एखादे अनुचित घटना घडण्याची शक्यता (जमाव एकत्रित होत असल्यास) दिसुन आल्यास त्याबाबत सुरक्षा रक्षकांने त्वरीत शिफ्ट मधील पर्यवेक्षीय अधिकारी यांना माहिती द्यावी.

iii) सीसीटीव्ही चित्रिकरणाचे निरीक्षण करणाऱ्या देखरेख करताना एखादी आक्षेपार्ह घटना घडल्याचे दिसुन आल्यास सुरक्षा रक्षकांने त्वरीत शिफ्ट मधील पर्यवेक्षीय अधिकारी यांना माहिती द्यावी.

iv) पर्यवेक्षीय अधिकारी यांनी अशा घटनांची माहिती मिळताच घटनेच्या ठिकाणी नजिकच्या सुरक्षा रक्षकास पाठवावे तसेच स्वतः देखील घटनास्थळी जावे,

v) घटनेची माहिती मुख्य सुरक्षा अधिकारी यांना कळवावी, ते कार्यवाहीबाबत मार्गदर्शन करतील. घटनेच्या स्वरुपानुसार ते स्वतः घटनास्थळी येतील व आवश्यक कार्यवाही करतील. आवश्यकतेप्रमाणे घटना व त्यावरील कार्यवाही यांची माहिती वरिष्ठांना कळवितील.

vi) मुख्य सुरक्षा अधिकारी यांचे कार्यालयात सीसीटीव्ही चित्रिकरण निरीक्षण करण्याची सुविधा आहे. कारवाईच्या अनुषंगाने पुराव्या दाखल आवश्यक असलेल्या घटनेचे चित्रीकरण जतन करतील.

vii) देखरेखी दरम्यान आढळून आलेल्या घटना व त्या अनुषंगाने केलेली कारवाई कारवाईची सद्यस्थिती याबाबतचा साप्ताहिक अहवाल मुख्य सुरक्षा अधिकारी यांनी मा. व्यवस्थापकीय संचालक व सह व्यवस्थापकीय संचालक यांना दर सोमवारी सादर करावा.

viii) सीसीटीव्ही यंत्रणा बंद झाल्यास त्याची माहिती सुरक्षा रक्षक हे पर्यवेक्षीय अधिकारी व मुख्य सुरक्षा अधिकारी यांना कळवतील व ती यंत्रणा पुर्ववत कार्यान्वित करण्यासाठी कार्यवाही करतील.

ix) मुंबई पोलिस दलाने चित्रनगरी परिसरात कॅमेरे बसविलेले आहेत. त्यासाठी पोलिस सीसीटीव्ही यंत्रणेच्या अधिकाऱ्यांशी मुख्य सुरक्षा अधिकारी हे समन्वय ठेवतील.

७ : अग्निसुरक्षा आणि आपत्कालीन कार्यपद्धती

दादासाहेब फाळके चित्रनगरी (फिल्मसिटी), मुंबई येथे चित्रीकरण करताना आगीच्या घटना टाळण्यासाठी आणि आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिका (BMC) अग्निशमन विभागाचे आणि चित्रनगरी प्रशासनाने जाहीर केलेल्या दि.०१/०७/२०२२ आणि दि.१३/१२/२०२५ मार्गदर्शक मानक अटी व शर्तीचे पालन करणे अनिवार्य आहे:

७.१ : चित्रीकरणापूर्वीची पूर्वतयारी (Pre-Shooting Compliance)

- **अग्नि सुरक्षा प्रमाणपत्र (NOC):** कोणत्याही सेटच्या बांधकामापूर्वी मुंबई अग्निशमन दलाचे नाहरकत प्रमाणपत्र (Fire NOC) मिळवणे आवश्यक आहे.
- **साहित्याची निवड:** सेट बांधताना ज्वलनशील साहित्य (उदा. कापड, लाकूड, रसायने) वापरणे शक्यतो टाळावे. शक्य असल्यास आग-रोधक (Fire-retardant) द्रावणांचा वापर करावा.
- **विद्युत तपासणी:** सर्व इलेक्ट्रिक केबल्स प्रमाणित (ISI मार्क) असाव्यात आणि जॉईंट्स सुरक्षितपणे टेप केलेले असावेत. सेटवरील मुख्य स्विच बोर्ड सहज उपलब्ध ठिकाणी असावा.

७.२ : सेटवरील अग्निसुरक्षा उपाययोजना (Fire Safety on Sets)

- **अग्निशामक उपकरणे:** प्रत्येक मजल्यावर किंवा सेटच्या मोकळ्या भागात पुरेशा प्रमाणात 'फायर एक्सटिंग्विशर' (ABC/CO२) असावेत. ते भरलेले (Charged) आणि सुस्थितीत असणे गरजेचे आहे. स्प्रिंकलर सिस्टीम आणि फायर अलार्म सुस्थितीत असावेत.
- **फायर मार्शलची नेमणूक:** निर्मिती संस्थेने आपल्या कर्मचाऱ्यांपैकी किमान एकाची 'फायर मार्शल' म्हणून नेमणूक करावी, ज्याला आग विझवण्याचे आणि आपत्कालीन परिस्थिती हाताळण्याचे प्रशिक्षण असेल.
- **धूम्रपान आणि उघडी आग:** सेटच्या आत धूम्रपान करणे, स्वयंपाक करणे किंवा मेणबत्त्यांसारख्या उघड्या ज्योतींचा वापर करण्यास सक्त मनाई आहे. फटाके किंवा 'पायरोटेक्निक्स' वापरण्यासाठी विशेष परवानगी आणि तज्ज्ञांची उपस्थिती आवश्यक असेल.
- **विद्युत उपकरणांची तपासणी:** ओव्हरलोडिंग (Overloading) टाळणे आणि खराब वायरिंग त्वरित बदलणे.

७.३ : ज्वलनशील पदार्थांची साठवणूक आणि त्यांची हाताळणी

- **धोकादायक वस्तूंची साठवण:** ज्वलनशील पदार्थ (उदा., पेट्रोल, डिझेल, गॅस, पेंट्स, सॉल्व्हेंट्स, थिनर्स) कुलूपबंद, हवेशीर आणि सुरक्षित ठिकाणी ठेवावेत.
- **प्रमाणाची मर्यादा:** एका दिवसाच्या कामासाठी आवश्यक असलेल्या प्रमाणातच साहित्य सेटवर किंवा स्टेजवर आणावे व दिवसाच्या शेवटी सर्व अतिरिक्त साहित्य साठवणूक क्षेत्रात परत ठेवणे आवश्यक आहे.
- **सुरक्षित हाताळणी:** जनरेटर किंवा इतर उपकरणांमध्ये इंधन भरणे हे एका निश्चित केलेल्या मोकळ्या जागेतच झाले पाहिजे. इंधन गळती रोखण्यासाठी योग्य साहित्य सहज उपलब्ध असेल याची खातरजमा करणे.

७.४ : आपत्कालीन कार्यपद्धती (Emergency Response SOP)

- अलार्म आणि सावधगिरी: आग लागल्याचे लक्षात येताच मोठ्याने "आग-आग" ओरडून किंवा अलार्म वाजवून सर्वांना सावध करा.
- बाहेर पडण्याचे मार्ग (Emergency Exits): सेटवर किमान दोन बाहेर पडण्याचे मार्ग असावेत जे नेहमी अडथळ्यांशिवाय मोकळे ठेवले पाहिजेत. या मार्गांवर 'EXIT' चे फ्लोरोसेंट बोर्ड लावलेले असावेत.
- वीज खंडित करणे: आग लागल्यास तात्काळ मुख्य विद्युत पुरवठा बंद करणे, जेणेकरून शॉर्ट-सर्किटमुळे आग पसरणार नाही.
- एकत्रीकरण स्थळ (असेम्बली पॉइंट): सर्व कलाकार / कामगार यांनी आधीच ठरवलेल्या सुरक्षित मोकळ्या जागेत (Assembly Point) जमा व्हावे आणि कोणाचीही अनुपस्थिती असल्यास तात्काळ सुरक्षा विभागाला कळवावे.

७.५ : संपर्क आणि समन्वय (Important Contacts)

कोणत्याही दुर्घटनेवेळी खालील क्रमांकांवर तात्काळ संपर्क साधावा:

- मुंबई अग्निशमन दल: १०१
- चित्रनगरी सुरक्षा विभाग: ९९२००११९४०
- आपत्कालीन रुग्णवाहिका: १०८

७.६ विद्युत सुरक्षा

- परवानाधारक कर्मचारी: दिवे आणि उपकरणांच्या वायरिंगसह सर्व तात्पुरती विद्युत कामे केवळ शासनमान्य परवानाधारक विद्युत कंत्राटदाराकडूनच केली पाहिजेत.
- सर्किट अखंडता: तात्पुरत्या किंवा "जोडलेल्या" वायरिंगचा वापर निषिद्ध आहे. सर्व वितरण बोर्डपासून उपकरणापर्यंत केबल्स एकाच, अखंड लांबीच्या असाव्यात. सर्व जोडण्या औद्योगिक दर्जाचे प्लग आणि सॉकेट्स वापरूनच केल्या पाहिजेत.
- अतिभार प्रतिबंध: सर्किट्सवर अतिभार टाकला जाऊ नये. विद्युत कंत्राटदाराने प्रत्येक सर्किटसाठी एकूण भाराची गणना करावी आणि तो वितरण बोर्ड व केबलिंगच्या सुरक्षित क्षमतेच्या मर्यादेत राहील याची खात्री करावी.
- पॅनल क्लिअरन्स: सर्व इलेक्ट्रिकल पॅनल आणि डिस्ट्रिब्युशन बोर्डच्या भोवती किमान ३६ इंच (अंदाजे १ मीटर) मोकळी जागा राखली पाहिजे. ही जागा कोणत्याही प्रकारच्या साठवणुकीसाठी वापरली जाऊ नये. पॅनलचे दरवाजे बंद आणि सहज हाताळता येतील असे ठेवले पाहिजेत.
- तपासणी: भाडेकरू /संस्था /निर्मिती संस्था यांच्या विद्युत पर्यवेक्षकाने चित्रीकरण सुरू होण्यापूर्वी सर्व तात्पुरत्या वायरिंग आणि उपकरणांची दररोज तपासणी करणे आवश्यक आहे आणि या तपासण्यांची नोंद ठेवणे आवश्यक आहे.

७.७ : उष्ण कामे, आतषबाजी आणि विशेष परिणाम

- काम करण्याची परवानगी प्रणाली: भाडेकरु /संस्था /निर्मिती संस्थेने "हॉट वर्क" म्हणजे उघड्या ज्वाला, ठिणग्या किंवा उच्च तापमान यांचा समावेश असलेली कोणतीही क्रिया, जसे की वेल्डिंग, ग्राइंडिंग, गॅस-कटिंग किंवा ब्लोटॉर्चचा वापर करताना आवश्यक ती खबरदारी व फायर मार्शल उपस्थित राहील याची खातरजमा करणे.

- आतषबाजी: कोणत्याही प्रकारची आतषबाजी किंवा स्फोटकांचा वापर केवळ परवानाधारक व्यावसायिका कडूनच हाताळले जाणे आवश्यक आहे. यासाठी आवश्यकतेप्रमाणे चित्रनगरी व्यवस्थापन किंवा स्थानिक अग्निशमन दल यांचेकडून पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे.

७.८ : अनुपालन, तपासणी आणि अंमलबजावणी

- तपासणीचा अधिकार: चित्रनगरीतील सुरक्षा अधिकाऱ्यांना अग्निसुरक्षा तपासणी करण्यासाठी, पूर्वसूचनेशिवाय, परिसरामधील कोणत्याही ठिकाणी कधीही प्रवेश करण्याचा अधिकार आहे.
- पालन न करणे: या धोरणाचे पालन न केल्यास तोंडी इशारा, लेखी सूचना, दंड, काम थांबवण्याचा आदेश किंवा करार रद्द करणे यांचा समावेश असू शकतो.
- महानगरपालिका अग्निशमन विभाग, पोलीस अधिकारी, स्फोटक विभाग इत्यादी संबंधित सक्षम प्राधिकरणांच्या लेखी परवानगीशिवाय इमारतीच्या आवारात किंवा कोणत्याही बाहेरील ठिकाणी आग लागण्याची किंवा ब्लास्टिंगची परवानगी दिली जाणार नाही.
- अनुपालन न केल्यास दंड: वैध परवानगीशिवाय अग्नीविषयक काम चालू असल्याचे आढळल्यास, ₹१,००,०००/- (एक लाख) दंड आकारला जाईल.

८ : सेट बांधकाम परवानगी आणि साहित्य व्यवस्थापन

चित्रनगरीत उभारण्यात / बांधण्यात येणाऱ्या स्थायी किंवा अस्थायी बांधकामांसाठी आवश्यक असणाऱ्या संबंधित विभागांच्या वैधानिक परवानग्या (उदा. म.न.पा.) घेणे आवश्यक आहे. गोरेगाव चित्रनगरीच्या परिसरातील सर्व बांधकाम, उभारणी, फेरबदल किंवा सर्व संरचना, मग त्या तात्पुरत्या स्वरुपाच्या किंवा कायमस्वरूपी स्वरूपाच्या असो त्यांची रचना, उभारणी अशा पद्धतीने केले जावे की ज्यामुळे त्यांची संरचनात्मक अखंडता टिकून राहील. तसेच सर्व वैधानिक सुरक्षा नियमांचे पालन होईल आणि परिसराच्या भौतिक मालमत्तेचे जतन होईल. अशा कामाकरीता संबंधित विभागांच्या वैधानिक परवानग्या घेणे आवश्यक आहे.

प्रशासनाच्या पूर्व, स्पष्ट आणि लेखी परवानगीशिवाय कोणत्याही स्वरूपाचे बांधकाम किंवा स्थापना सुरू केली जाणार नाही. तोंडी चर्चा किंवा अनौपचारिक सामंजस्य ही मंजुरी मानली जाणार नाही.

- सामग्री : बांधकामात वापरण्यात येणाऱ्या सर्व ज्वलनशील सामग्री सेटसाठी लागणारे लाकूड, प्लायवूड, कापड, पडदे आणि कार्पेटिंग यांवर प्रमाणित अग्निरोधक रसायनांचा वापर करून उपयोगात आणणे आवश्यक आहे.
- साहित्य: जळताना दाट, विषारी किंवा गंजणारा धूर निर्माण करणाऱ्या साहित्याच्या (उदा., काही विशिष्ट प्रक्रिया न केलेले प्लॅस्टिक, पॉलीयुरेथेन फोम) वापरास सक्त मनाई आहे.
- सुरक्षित अंतर: तात्पुरत्या सेट संरचनेचा कोणताही भाग आणि ओव्हरहेड जिवंत विद्युत तारा यांच्यामध्ये सुरक्षित अंतर राखणे अनिवार्य आहे.
- कचरा व्यवस्थापन: लाकडाचा भूसा, कापडाचे तुकडे यांसारखा ज्वलनशील बांधकाम कचरा कामाच्या ठिकाणी ठेवून त्याची विल्हेवाट लावणे.
- साहित्य आणणे: जर एखाद्या निर्मिती संस्थेला सेट उभारणीसाठी किंवा जमीन समतल करण्यासाठी वाळू, माती किंवा डेब्रीज इत्यादी आणायचा असेल, तर त्यासाठी प्रति ट्रक ₹२०,००० सुरक्षा अनामत आगाऊ भरणा करुन परवानगी घ्यावी लागेल. आरक्षण संपल्यानंतर चित्रनगरीच्या आवारातून असे सर्व साहित्य पूर्णपणे

आणि पडताळणी करून काढून टाकल्यानंतरच ही सुरक्षा अनामत परत केली जाईल. साहित्य न काढल्यास ठेव जप्त केली जाईल आणि अतिरिक्त स्वच्छता शुल्क आकारले जाईल.

- **अनधिकृत मातीचा भरणा** :- महामंडळाच्या परिसरातील जागेवर विना परवानगी मातीचा भराव करण्यास बंदी आहे. असे केल्याचे निदर्शनास आल्यास सदर संस्थेविरुध्द फौजदारी कारवाई करुन संस्थेच्या चित्रीकरणास चित्रनगरीमध्ये प्रतिबंध करण्यात येईल.

८.१ : बांधकाम करण्याच्या परवानगीसाठी अर्ज

संबंधित संस्थेने किंवा व्यक्तीने महामंडळाच्या अभियांत्रिकी स्थापत्य (Civil Department) विभागाकडे परवानगीसाठी औपचारिकपणे अर्ज करणे आवश्यक आहे.

- प्रस्तावित संरचनेचे व्यावसायिकरित्या प्रमाणित Structural Engineer यांचे कडून तयार केलेले आराखडे, उंची आणि विभागीय रेखाचित्रे. ही रेखाचित्रे मीटरमध्ये मोजलेली असावीत आणि त्यामध्ये वापरलेले साहित्य, जोडकाम व अंतिम रूप देण्याचा तपशील समाविष्ट असावा. तसेच एक स्पष्ट नकाशा, ज्यामध्ये विद्यमान इमारती, प्रवेश रस्ते आणि अग्निसुरक्षा उपकरणांच्या संदर्भात प्रस्तावित संरचनेचा नेमका आराखडा दर्शवलेला असावा.
- सर्व साहित्याची संपूर्ण यादी वापरण्यात येणाऱ्या बाबींमध्ये लाकडाचा प्रकार आणि दर्जा, स्टीलची जाडी, फॅब्रिकची रचना, तसेच रंग आणि रासायनिक प्रक्रियांचा तपशील यांचा समावेश असावा.
- सुरक्षित उभारणी आणि काढणीसाठीची टप्प्याटप्प्याची कार्यपद्धती स्पष्ट करणारा संपूर्ण प्रस्ताव कामाच्या अर्ज कामाच्या प्रारंभाच्या प्रस्तावित तारखेच्या किमान २१ कामकाजाच्या दिवसांपूर्वी सादर करणे आवश्यक राहील.

८.२ : संरचनात्मक स्थिरता प्रमाणीकरण

चित्रनगरीतील अस्थायी स्वरुपाच्या कोणत्याही बांधकामासंदर्भात परवानाधारक आणि नोंदणीकृत चार्टर्ड स्ट्रक्चरल इंजिनिअरने स्वाक्षरी केलेले स्ट्रक्चरल स्टॅबिलिटी सर्टिफिकेट (संरचनात्मक स्थिरता प्रमाणपत्र) ही एक अनिवार्य आवश्यकता आहे. या प्रमाणपत्रात हे प्रमाणित केलेले असले पाहिजे की, अभियंत्याने आराखड्यांचे पुनरावलोकन केले आहे आणि प्रस्तावित रचना तिच्या हेतूसाठी सुरक्षित असून, ती पर्यावरणीय घटकांसह अपेक्षित भार सहन करू शकते.

८.३ : छाननी आणि परवानगी

संपूर्ण अर्ज प्राप्त झाल्यावर, अभियांत्रिकी विभागाकडून संरचनात्मक मजबुतीसाठी, आराखड्यांची बारकाईने छाननी करुन बांधकामास परवानगी देण्यात येईल. अशा परवानगी शिवाय होणारे कोणत्याही प्रकारचे बांधकाम अनधिकृत असेल व त्याबाबत प्रचलित शासन नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

८.४ : अनधिकृत बांधकामे आणि दंड

"अनधिकृत बांधकाम" म्हणजे वैध मांडणी नकाशा (LOP - Layout Plan) शिवाय उभारलेले कोणतेही बांधकाम, किंवा एलओपीमध्ये मंजूर केलेल्या आराखड्यांपेक्षा लक्षणीयरीत्या वेगळे असलेले बांधकाम. अशा बांधकामाची उभारणी हा कराराचा गंभीर भंग मानला जाईल.

- तात्काळ कारवाई: अनधिकृत बांधकाम आढळून आल्यास, प्रशासन खालील तात्काळ कारवाई करेल:
  १. काम थांबवण्याचा आदेश आणि कराराच्या उल्लंघनाची औपचारिक सूचना जारी करेल.

२. बांधकाम तात्काळ आणि पूर्णपणे पाडून टाकण्यासाठी आणि जागा रिकामी करण्यासाठी २४ तासांची नोटीस बजावणे.

३. भाडेकरार तात्काळ प्रभावाने रद्द करणे.

- **सर्व भरलेल्या रकमेचे जप्तीकरण:** अशा परिस्थितीत, भाडेकरूने चित्रनगरीला दिलेली सर्व रक्कम, ज्यामध्ये संपूर्ण भाडे आणि संपूर्ण सुरक्षा अनामत रक्कम यांचा समावेश आहे, कोणत्याही दाव्याशिवाय जप्त केली जाईल.
- **अंमलबजावणी आणि दायित्व:** जर भाडेकरूने २४ तासांच्या सूचनेचे पालन केले नाही, तर प्रशासनाला आवश्यक त्या कोणत्याही मार्गाने ती रचना पाडण्याचा अधिकार आहे. या कारवाईत होणाऱ्या सर्व खर्चासाठी भाडेकरू जबाबदार असेल. या सक्तीच्या काढणीदरम्यान भाडेकरूच्या मालमत्तेचे कोणतेही नुकसान झाल्यास प्रशासन जबाबदार राहणार नाही.
- **भविष्यातील आरक्षण:** निर्मिती कंपनी, तिचे संचालक आणि संबंधित प्रमुख व्यक्तींना गोरेगाव चित्रनगरीमध्ये भविष्यात कोणतेही आरक्षण करण्यापासून प्रतिबंधित केले जाऊ शकते.

### ८.५ : सेट उभारणी आणि तोडणी संबंधी नियम

#### ८.५.१ : वेळेचे वाटप आणि भाड्याची आकारणी

- **सवलतीचा कालावधी:** आरक्षण शुल्कामध्ये, चित्रीकरणाच्या आधी दोन (२) कॅलेंडर दिवसांपर्यंत उभारणीसाठी आणि चित्रीकरणानंतर दोन (२) कॅलेंडर दिवसांपर्यंत पूर्णपणे उतरवणे आणि साफसफाईसाठी सवलतीचा कालावधी समाविष्ट आहे.
- **अतिरिक्त शुल्काची आकारणी:** उभारणी किंवा काढण्याची प्रक्रिया या सवलतीच्या कालावधीपेक्षा जास्त काळ चालल्यास, प्रत्येक अतिरिक्त दिवसासाठी किंवा त्याच्या कोणत्याही भागासाठी जागेचे पूर्ण दैनिक भाडे आकारले जाईल.

### ८.६ : सेट हस्तांतरण आणि अनधिकृत संरचनांसंबंधी धोरण

#### ८.६.१ : अधिकृत सेट हस्तांतरण धोरण

एका बाह्य चित्रिकरण स्थळावर उभारलेल्या सेटचे एका निर्मिती संस्थेकडून ("हस्तांतरणकर्ता") दुसऱ्या निर्मिती संस्थेकडे ("हस्तांतरिती") हस्तांतरीत करण्यासाठी कलागारे विभागाची परवानगी अनिवार्य असेल.

- **हस्तांतरणासाठी अर्ज:** प्रस्तावित हस्तांतरणासाठी हस्तांतरक आणि हस्तांतरिती या दोनही संस्थांनी अर्ज सादर करणे आवश्यक आहे.
- **निश्चित हस्तांतरण शुल्क:** या हस्तांतरणावर ₹ १०,००,०००/- (दहा लाख रुपये) अधिक जीएसटी असे निश्चित हस्तांतरण शुल्क आकारले जाईल.
- **भरणा आणि दायित्व:** हस्तांतरणाला अधिकृत मान्यता मिळाल्यावर हे शुल्क महामंडळाला पूर्णपणे भरणे आवश्यक आहे. हस्तांतरण पूर्ण झाल्यावर, सेटशी संबंधित सर्व जबाबदाऱ्या आणि दायित्वे सेटचे अंतिम विघटन, जागेची साफसफाई आणि कोणतीही नुकसान भरपाई इत्यादी सर्व जबाबदाऱ्या सेटचा ताबा घेणाऱ्या निर्मिती संस्थेच्या असतील.

- सहमतीशिवाय केलेले हस्तांतरण (Sublet) म्हणजेच बेकायदेशीर किंवा अनधिकृत हस्तांतरण आहे. सबलेटींगला परवानगी नाही. यासाठी दंडात्मक कारवाई केली जाईल तसेच पोलीस स्टेशनमध्ये फसवणूक (Fraud) केस म्हणून FIR दाखल केले जाईल व जागा महामंडळ ताब्यात घेईल.

९ : सर्वसमावेशक कचरा व्यवस्थापन नियमावली

दादासाहेब फाळके चित्रनगरीत कचरा व्यवस्थापनासाठी महानगरपालिकेच्या नियमानूसार खालीलप्रमाणे नियम निश्चित करण्यात येत आहेत.

९.१ : कचरा निर्मितीच्या ठिकाणी वर्गीकरण

चित्रनगरी परिसरात तसेच चित्रनगरीतील चित्रीकरण स्थळांवर मोठ्या प्रमाणावर लोकांची ये-जा असल्यामुळे दररोज प्रचंड कचरा तयार होतो. कचरा जिथे निर्माण होतो तिथेच सर्व कचरा वेगळा करावा, हे सुनिश्चित करण्याची जबाबदारी भाडेकरू / संस्थेची राहील. बांधकाम आणि तोडफोडीतून निर्माण झालेला कचरा (उदा., लाकूड, धातू, प्लास्टर, थर्माकोल इत्यादी) सामान्य कचऱ्यात मिसळू नये. त्याचे स्वतंत्र संकलन करुन विल्हेवाट लावणे आवश्यक आहे. शूटिंग सेटवर / परिसरात कचरा निर्मितीच्या ठिकाणीच त्याचे वर्गीकरण करणे पर्यावरण आणि कायदेशीर नियमांनुसार अत्यंत गरजेचे आहे. कचऱ्याचे वर्गीकरण करण्यासाठी स्पष्ट बोर्ड लावलेल्या कचरापेट्या (Bins) ठेवल्या पाहिजेत जसे की,

- ओला कचरा : उरलेले अन्न (खरकटं), चहा-कॉफीची पावडर, फळांची व भाज्यांची साले, उरलेले पाण्याचे कागदी कप इ.
- सुका कचरा : प्लास्टिक बाटल्या, कोल्ड्रिंक्सचे कॅन्स, कागद, पुठ्ठे, थर्माकोल, स्क्रिप्टचे कागद, पॅकिंग साहित्याचे प्लास्टिक इ.
- सेट उभारणीचा कचरा : लाकडाचे तुकडे, प्लायवूड, खिळे, स्क्रू, उरलेला रंग (Paint), पीओपी (POP), फायबर ग्लास, कापडाचे तुकडे आणि दोऱ्या इ.
- घातक कचरा : वापरलेले मास्क, ग्लोव्हज, सॅनिटरी नॅपकिन्स, सॅनिटायझरच्या रिकाम्या बाटल्या, कापूस (Makeup Cotton), आणि ओले मऊ कापड किंवा ओले टीश्यु पेपर इ.
- इ-कचरा : वापरलेल्या बॅटऱ्या (Cells), खराब झालेल्या वायर्स, जळलेले लाईट बल्ब्स, इलेक्ट्रॉनिक सुटे भाग इ.

अशाप्रकारच्या वर्गीकरणाच्या कचरापेट्या एकत्र (जोडीने) ठेवाव्यात.

- रंगाचे डबे, सॉल्व्हेंटचे कंटेनर, वापरलेल्या बॅटरी, फुटलेल्या फ्लोरोसेंट ट्यूब, ई-कचरा आणि रासायनिक कंटेनर असा कचरा कोणत्याही सामान्य कचरा प्रवाहात टाकणे हे पूर्णपणे बेकायदेशीर आहे आणि हा कराराचा गंभीर भंग मानला जाईल.
- भाडेकरू /निर्मिती संस्था /संस्था यांनी कचऱ्याचे संकलन आणि विल्हेवाटीची व्यवस्था करणे आवश्यक आहे.

९.२ : नियमांचे पालन न केल्यास दंड

- अयोग्य विल्हेवाटीसाठी दैनिक दंड: कोणत्याही प्रकारचा कचरा आढळल्यास भाडेकरूच्या भाड्याच्या जागेत किंवा आजूबाजूच्या कोणत्याही सामायिक जागेत कचऱ्याची अयोग्य विल्हेवाट लावल्यास, तो पसरल्यास

किंवा साचल्यास, प्रशासन उल्लंघनाची औपचारिक नोटीस बजावेल. जोपर्यंत उल्लंघन सुरू राहील, तोपर्यंत प्रत्येक दिवसासाठी ₹२५,०००/- (पंचवीस हजार रुपये) दंड आकारला जाईल. प्रशासनाच्या समाधानार्थ कचरा पूर्णपणे साफ होईपर्यंत हा दंड दररोज आकारला जाईल. हा दंड, प्रशासनाला येणाऱ्या आणि भाडेकरूकडून आकारल्या जाणाऱ्या कोणत्याही प्रत्यक्ष साफसफाईच्या खर्चाव्यतिरिक्त असेल.

## १० : चित्रिकरण पूर्ण झाल्यानंतरची कार्यवाही

### १०.१ : अंतिम साफसफाई

चित्रीकरण पूर्ण झाल्यावर आणि सेट काढल्यावर, भाडेकरूने त्या जागेची अंतिम, सखोल स्वच्छता आणि पुनर्स्थापना करणे आवश्यक आहे. या "रॅप-आउट" प्रक्रियेमध्ये खालील गोष्टींचा समावेश असणे आवश्यक आहे:

- परिसरातील सर्व उभारलेल्या रचना आणि साहित्य काढून टाकणे.
- सर्व खिळे, स्क्रू आणि इतर जोडणीचे साहित्य काढून टाकणे, आणि कोणतीही छिद्रे व्यवस्थित भरणे.
- किमान दर्जा म्हणून संपूर्ण फरशी झाडून स्वच्छ करणे आवश्यक आहे.
- सर्व फलक, खुणा आणि चिकट टेपचे अवशेष काढून टाकणे.
- अंतिम पाहणी तपासणीसाठी चित्रनगरी प्रशासनाच्या नियुक्त अधिकाऱ्यासोबत भाडेकरूचा प्रतिनिधी उपस्थित असणे अनिवार्य आहे.
- चित्रिकरण स्थळांची जैसे थे बाबतील सर्व आवश्यकतांची पूर्तता झाली आहे याची खात्री करण्यासाठी, पूर्वनिर्धारित तपासणी सूचीनुसार तपासणी केली जाईल.

#### १०.१.१ : सामायिक आणि बाह्य क्षेत्रांची देखभाल

- **कचरा टाकणे:** चित्रनगरीच्या परिसरामध्ये कोठेही कचरा टाकण्यास सक्त मनाई आहे आणि त्यासाठी दंड आकारला जाईल.
- **वनस्पतींचे नुकसान:** झाडे, रोपे आणि सुशोभित परिसराची तोडफोड करणे किंवा नुकसान पोहोचवणे हा एक गंभीर गुन्हा आहे.
- **मालमत्तेचे नुकसान :** चित्रनगरीच्या मालमत्तेचे नुकसान होणार नाही याची खात्री करणे ही निर्मिती संस्थेची जबाबदारी असेल अन्यथा संस्था दंडास पात्र असेल.

## ११ : सर्वसाधारण नियम

### ११.१ : ड्रोनचा (यूएव्ही) वापर

- **पूर्वपरवानगी अनिवार्य:** सक्षम प्राधिकरणाकडून (उदा., पोलीस आयुक्त कार्यालय, ऑपरेशन्स शाखा) वैध परवानगी घेतल्याशिवाय चित्रीकरणासाठी ड्रोनचा (DRONE) वापर करण्यास सक्त मनाई आहे.
- **नियमांचे पालन न केल्यास दंड:** वैध परवान्याशिवाय ड्रोन चालवताना आढळल्यास, ₹२५,०००/- (पंचवीस हजार रुपये) दंड आकारला जाईल आणि उपकरण जप्त करून पुढील कार्यवाहीसाठी पोलीस विभागाच्या ताब्यात देण्यात येईल.

११.२ : प्राण्यांचा वापर

- **AWBI ची परवानगी आवश्यक** : भारतीय प्राणी कल्याण मंडळ (AWBI) या सक्षम प्राधिकरणाकडून वैध मंजुरीशिवाय कोणत्याही चित्रिकरणांमध्ये प्राण्यांचा / जनावरांचा वापर करण्यास परवानगी नाही.
- **नियमांचे पालन न केल्यास दंड:** आवश्यक परवानगीशिवाय प्राण्यांचा वापर होत असल्याचे आढळल्यास, ₹ २५,०००/- (पंचवीस हजार रुपये) दंड आकारला जाईल.

११.३ : परदेशी नागरिकांचा सहभाग

- **वैध वर्क व्हिसा अनिवार्य:** प्रत्यक्षात चित्रीकरणात भाग घेणाऱ्या कोणत्याही परदेशी नागरिकाकडे वैध "एफ व्हिसा" असणे आवश्यक आहे (व्हिसाचा प्रकार आणि वैधता इमिग्रेशन ब्युरोनुसार).
- टेक्निकल / तांत्रिक कामकाजासाठी कोणत्याही परदेशी नागरिकाकडे वैध "वर्किंग व्हिसा" असणे आवश्यक आहे.
- पर्यटक किंवा इतर व्हिसा प्रकारांना चित्रिकरण विषयक कामासाठी परवानगी नाही.
- **नियमांचे पालन न केल्यास दंड:** जर एखादा परदेशी नागरिक वैध वर्क व्हिसाशिवाय एखाद्या निर्मिती संस्थेमध्ये काम करत असल्याचे आढळल्यास, संबंधित प्रॉडक्शन कंपनीवर ₹ २५,०००/- (पंचवीस हजार रुपये) दंड आकारला जाईल.

११.४ : अनधिकृत चित्रीकरण

- अनधिकृत चित्रीकरणासाठी दंड: जर कोणतीही व्यक्ती किंवा कंपनी दुसऱ्या प्रोडक्शन कंपनीच्या सेटचे किंवा चित्रिकरणाच्या कामाचे अनधिकृतपणे किंवा बेकायदेशीरपणे चित्रीकरण करत असल्याचे आढळल्यास, दोषी पक्ष/व्यक्तीवर ₹ ५,०००/- (पाच हजार रुपये) दंड आकारला जाईल.

**११.५ : अन्न सुरक्षा नियम :** चित्रनगरीमध्ये सुरू असणाऱ्या चित्रीकरणाच्या संदर्भात, कलाकार, क्रू आणि तांत्रिक कर्मचाऱ्यांचे आरोग्य आणि सुरक्षितता असणे अत्यंत महत्त्वाचे आहे. सेटवर पुरविण्यात येणाऱ्या केटरिंगच्या व्यवस्थापनाने व निर्मिती संस्थेने, अन्नजन्य आजार आणि जंतुसंसर्ग टाळण्यासाठी अन्न सुरक्षा आणि मानके (अन्न व्यवसायांचे परवाना आणि नोंदणी) विनियम, २०११ च्या अनुसूची ४ (स्वच्छता आणि आरोग्यविषयक पद्धतींवरील सामान्य आवश्यकता) अंतर्गत चिहित केलेल्या वैधानिक आवश्यकतांनुसार, काटेकोर पालन करणे अनिवार्य आहे (SOP पृ.क्र.२५ ते २८/पवि). या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन न केल्यास एफएसएस कायदा, २००६ च्या कलम ५६ आणि इतर लागू कलमांनुसार संबंधित निर्मिती संस्था व केटरर्सवर अन्न आणि औषध प्रशासन यांच्याकडून त्यांच्या नियमानुसार कायदेशीर कारवाई केली जाईल.

**११.६ : आरक्षण, आरक्षण रद्द केल्यास त्याचे नियम, विमा, चित्रिकरण सबंधित सवलती व अटी-शर्ती इत्यादी महामंडळाच्या दि.०१/०७/२०२२२ आणि दि.१३/१२/२०२५ च्या कार्यालयीन आदेशानुसार निर्मिती संस्थाना लागू असतील.**

१२ : निर्मिती संस्थेच्या सर्व साधारण जबाबदाऱ्याः

- निर्मिती संस्थांच्या चित्रिकरणाच्या दरम्यान झालेल्या कोणत्याही नुकसानाची परिसराची दुरुस्ती आणि देखभाल करणे.
- परवानाकृत परिसर आणि परिसराकडे जाणारे रस्ते आणि उर्वरित मालमत्तेसह जवळपासच्या भागांची काळजी घेणे.
- परिसरामध्ये कोणताही उपद्रव होऊ नये आणि केवळ त्यांना दिलेल्या क्षेत्रातच काम करावे, इतरत्र चित्रिकरण करुन नये.
- बांधलेला सेट आणि त्यांच्यामध्ये बदल केल्यामुळे झालेली मोडतोड इत्यादी काढून टाकणे आणि वापरापूर्वीच्या स्थितीतील जागा महामंडळास सुपूर्द करणे.
- चित्रिकरणासाठी उपलब्ध करुन दिलेल्या स्थळावरील प्रत्येक बाबींची जबाबदारी घेऊन संबंधित कर्मचाऱ्यांच्या जबाबदाऱ्यांचे आणि कोणताही गैरप्रकार न करता चित्रिकरण शांततेने पार पाडले जाईल, याची दक्षता घ्यावी.
- चित्रनगरी परिसरात मद्यपान करण्याची परवानगी नाही. कोणताही क्रू मेंबर अशा बाबींमध्ये गुंतलेला आढळल्यास त्याला काळ्या यादीत (Black List) टाकले जाईल.

१३ : अंतिम अधिकार

- अंतिम अधिकार: गोरेगाव चित्रनगरीचे व्यवस्थापकीय संचालक, किंवा त्यांचे नियुक्त प्रतिनिधी, हे या मानक प्रणालीत नमूद केलेल्या सर्व धोरणांच्या अर्थनिर्धारण आणि अंमलबजावणीसाठी अंतिम अधिकारी असतील.
- दुरुस्तीचा अधिकार: प्रशासन कोणत्याही वेळी या प्रमाणित मानक कार्यप्रणालीमध्ये दुरुस्ती, फेरबदल किंवा भर घालण्याचा अधिकार राखून ठेवते. अशा कोणत्याही बदलांची सूचना निर्मिती संस्थांना दिली जाईल.

.....................

(परिशिष्ट-१)

महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित
(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

orporation
SGC019882

दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगांव (पूर्व), मुंबई - ४०० ०६५.
दूरध्वनी क्र. - २८४० १५३३, २८४० १७५५, २८४१ ७५०० फॅक्स : २८४० ०७३४

क्र.आस्थापना/सुरक्षा- २०२०/प्र.क्र.२४/४६५
दिनांक: १८/०८/२०२०

कार्यालयीन आदेश

मा.संचालक मंडळाच्या दि.११.०२.२०२० रोजी बैठकीतील ठराव क्र.१५३/०५ अन्वये पारित करण्यात आल्यानुसार महामंडळाच्या परिसरात अनधिकृत वावरणाऱ्या व्यक्ती व वाहनांकडून वसूल करण्यात दंडाची रक्कम वाढविणेबाबतचा प्रस्ताव मान्य करण्यात आला आहे.

दंडात्मक रक्कम आकारणीचा तपशिल खालील प्रमाणे निश्चित करण्यात आला असून त्यानुसार आकारणी करण्यात यावी.

| अनाधिकृतपणे प्रवेश केलेली व्यक्ती/वाहन | दंडाची रक्कम |
|---|---|
| अनाधिकृतपणे प्रवेश केलेली व्यक्ती | रु.१,५००/- |
| अनाधिकृतपणे प्रवेश केलेली दुचाकी वाहने | रु.५०० + प्रति व्यक्ती रु.१,५००/- |
| अनाधिकृतपणे प्रवेश केलेली तीनचाकी वाहने | रु.१००० + प्रति व्यक्ती रु.१,५००/- |
| अनाधिकृतपणे प्रवेश केलेली चारचाकी वाहने | रु.२००० + प्रति व्यक्ती रु.१,५००/- |
| अनाधिकृतपणे प्रवेश केलेली त्यापेक्षा मोठी वाहने | रु.१००००/- |

उपरोक्त दंड वसुली करण्यासाठी मुख्य सुरक्षा अधिकारी, सुरक्षा विभाग यांना प्राधिकृत करण्यात आले आहे.

(व्यवस्थापकीय संचालक यांच्या मान्यतेने)

सह व्यवस्थापकीय संचालक (अ.का.)

मुख्य सुरक्षा अधिकारी
सर्व विभाग प्रमुख
महाराष्ट्र सुरक्षा बल.
माहितीकरीता सविनय सादर,
मा.व्यवस्थापकीय संचालक
सह व्यवस्थापकीय संचालक

(परिशिष्ट-२)

| क्र. | महत्वाचे दूरध्वनी क्रमांक | |
|---|---|---|
| १ | सुरक्षा नियंत्रण कक्ष | ९९२००१११४० |
| २ | चित्रनगरी आरक्षण कक्ष | ७७३८८२६१८६ |
| ३ | १. अग्निशमन दल चित्रनगरी | ८०८०१३१७०३ |
| | २. दिंडोशी अग्निशमन दल | ०२२ २८४०६७२९ |
| ४ | रुग्णवाहिका | १०८ |
| ५ | प्राणीमित्र / सर्पमित्र | |
| | १. श्री.आयान खान (KD) | ७४००२०५९५९ / ७०२१३५७८२३ |
| ६ | पशुवैद्यकीय दवाखाने | |
| | १. डॉ. नागरे | ९५०३८०२१८० |
| | २. पशुवैद्यकीय महाविद्यालय (गोरेगाव, मुंबई) | ७९४७११०७१४ |
| | १. पशुवैद्यकीय महाविद्यालय (परेल, मुंबई) | २४१३७५१८ |
| ७ | वन विभाग नियंत्रण कक्ष | ठाणे - २५४४५४५९ |
| | | संजय गांधी राष्ट्रीय उद्यान - २८८६६४४९ |
| | | मुंबई रेंज - ८१०४९२६३१३ |
| ८ | पोलिस | आरे पोलिस ठाणे - २९२७२४८५ / १०० |
| | | दिंडोशी पोलिस ठाणे - २८७७०७८१ |
| ९ | नजीकचे रुग्णालय | ट्रॉमा सेंटर, जोगेश्वरी |
| १० | आरे प्रशासन विभाग | २९२७२४९४ / ४९५ |
| ११ | चित्रनगरी कार्यालय | |
| | १. मा. व्यवस्थापकीय संचालक | ६९३०९८०५ |
| | २. सह व्यवस्थापकीय संचालक | ६९३०९८०७ |
| | ३. व्यवस्थापक (कलागारे) | ६९३०९८१२ |
| | ४. मुख्य सुरक्षा अधिकारी | ६९३०९८१४ |

(परिशिष्ट-३)

## शुल्क आणि आकारणीचे वेळापत्रक

या विभागात विशिष्ट सेवा, कार्यक्रम आणि वाहतुकीसाठीच्या प्रमाणित शुल्कांची रूपरेषा दिली आहे.

| सेवा/कार्यक्रम/स्थिती | लागू शुल्क (जीएसटी वगळून) | शेरा |
|---|---|---|
| मानक बुकिंग | दरपत्रकानुसार (विभाग १ आणि २) | प्रति २४ तासांचा दिवस (सकाळी ०७:०० ते सकाळी ०६:५९) |
| "इव्हेंट" साठी बुकिंग करणे | त्या ठिकाणच्या प्रमाणित दैनिक दराच्या दुप्पट (२x) दराने. | चित्रीकरण न होणाऱ्या सार्वजनिक किंवा खाजगी कार्यक्रमांसाठी. |
| हेलिकॉप्टर उतरण्याचे शुल्क | प्रत्येक लँडिंगसाठी ₹२८,७५० | सर्व सक्षम प्राधिकरणांकडून पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे. |
| सेट हस्तांतरण शुल्क | ₹१०,००,००० | एका प्रोडक्शनमधून दुसऱ्या प्रोडक्शनमध्ये सेट हस्तांतरित करण्यासाठी. |
| आरक्षित नसलेल्या ठिकाणी पार्किंग | पार्किंगसाठी वापरलेल्या जागेचे पूर्ण दैनिक भाडे. | "सेट व्यापलेला आहे" म्हणून शुल्क आकारले. |
| शासकीय संस्थांसाठी सवलत | सर्वसाधारण दरांवर ५०% सूट. | अधिकृत सरकारी प्रकल्पांसाठी आणि मोहिमांसाठी. |
| मराठी भाषेतील चित्रपट / मालिकांना सवलत | सर्वसाधारण दरांवर ५०% सूट. | मराठी भाषेतील चित्रपट / मालिकांसाठी |
| मराठी भाषेतील Music Album, Short Film, यांच्यासाठी सवलत | १ वर्षाच्या कालावधीपर्यंत सर्वसाधारण दरांवर ५०% सूट. | मराठी भाषेतील Music Album, Short Film, यांच्या चित्रिकरणासाठी. |
| मराठी भाषेतील Reality Show, Game Show, Dance Show याकरीता सवलत | १ वर्षाच्या कालावधीपर्यंत सर्वसाधारण दरांवर २५% सूट. | मराठी भाषेतील Reality Show, Game Show, Dance Show यांच्या चित्रिकरणासाठी. |

(परिशिष्ट-४)

दंड आणि ठेवींची अनुसूची

या विभागात विशिष्ट कार्यप्रणाली धोरणांच्या उल्लंघनासाठी असलेल्या दंडांची रूपरेषा दिली आहे.

| उल्लंघन/अट | लागू दंड / ठेव | शेरा |
|---|---|---|
| जागा रिकामी करण्यास नकार देणे | दररोज ₹१,००,००० + दुप्पट दैनिक भाडे | विलंबास कारणीभूत असलेल्या निर्गमन संस्थेला आकारण्यात येईल. |
| अयोग्य कचरा विल्हेवाट | प्रति दिन ₹२५,००० | परिसर रिकामा होईपर्यंत दररोज शुल्क आकारले जाईल. |
| विना परवानगी ड्रोनचा वापर | ₹२५,००० अधिक उपकरणांची जप्ती | |
| परवानगीशिवाय प्राण्यांचा वापर | ₹२५,००० | |
| चुकीच्या व्हिसावर असलेला परदेशी नागरिक | ₹२५,००० | निर्मिती संस्थेस आकारण्यात येईल. |
| दुसऱ्या सेटचे अनधिकृत चित्रीकरण | ₹५,००० | दोषी पक्षाकडून शुल्क आकारले जाईल. |
| वाळू/माती/डेब्रीज साठी अनामत | ₹२०,००० प्रति ट्रक | साहित्य पूर्णपणे काढून नेल्यावर परतावा मिळेल. |
| महामंडळाच्या मालमत्तेचे नुकसान | दुरुस्तीचा संपूर्ण खर्च + प्रशासकीय शुल्क | प्रशासनाकडून मूल्यांकन करून भाडेकरूकडून वसूल करण्यात आले. |
| वैध अग्निशमन परवानगी शिवाय काम करणे | ₹१,००,००० | निर्मिती संस्थेला आकारण्यात येईल. |

(परिशिष्ट-५)

**बुकिंग रद्द करण्याचे धोरण**

बुकिंग सुरू होण्याच्या तारखेच्या तुलनेत रद्द करण्याच्या विनंतीच्या वेळेनुसार, आगाऊ भाड्याच्या रकमेतून रद्द करण्याचे शुल्क वजा केले जाते.

| रद्द करण्याच्या सूचना कालावधी | लागू कपात |
|---|---|
| बुकिंग सुरू होण्याच्या तारखेच्या १० किंवा अधिक दिवस आधी | एकूण बुकिंग मूल्याच्या १०% |
| बुकिंग सुरू होण्याच्या तारखेच्या ६ ते ९ दिवस आधी | एकूण बुकिंग मूल्याच्या २५% |
| बुकिंग सुरू होण्याच्या तारखेच्या ५ किंवा त्यापेक्षा कमी दिवस आधी | एकूण बुकिंग मूल्याच्या ५०% |
| बुकिंग कालावधी सुरू झाल्यानंतर रद्द करणे | रद्द केलेल्या दिवसांसाठी एकूण बुकिंग मूल्याच्या ५०% |
| पर्यायी बुकिंगसह रद्द करणे | पुन्हा बुक केलेल्या कालावधीसाठी १०% प्रशासकीय शुल्क |

(परिशिष्ट-६)

**FOOD AND DRUGS ADMINISTRATION (FDA), MAHARASHTRA**

**OFFICIAL MEMORANDUM & STANDARD OPERATING PROCEDURE (SOP)**

**FROM:**

Akash Chovan

Food Safety Officer (FSO)

Food and Drugs Administration (FDA), Maharashtra

**TO:**

The Head of the Unit

Dadasaheb Phalke Chitranagari (Goregaon Film City)

Goregaon (East), Mumbai - 400065

**DATE:** May 20th, 2026

**SUBJECT: STANDARD OPERATING PROCEDURE (SOP) FOR CATERERS OPERATING WITHIN FILM CITY PREMISES AS PER SCHEDULE 4 OF THE FSS ACT, 2006**

---

Respected Sir/Madam,

With reference to the ongoing and upcoming film and television shoots at Goregaon Film City, ensuring the health and safety of the cast, crew, and technical staff is of paramount importance. Given the bulk nature of catering on sets, strict adherence to food safety standards is mandatory to prevent foodborne illnesses and contamination.

In accordance with the statutory requirements laid down under **Schedule 4 (General Requirements on Hygienic and Sanitary Practices) of the Food Safety and Standards (Licensing and Registration of Food Businesses) Regulations, 2011**, this official Standard Operating Procedure (SOP) is being issued for immediate implementation across all catering units operating within your jurisdiction.

Kindly circulate this document to all production houses, event managers, and empanelled/external caterers operating inside Film City. Non-compliance with these guidelines will invite strict penal action under Section 56 and other applicable sections of the FSS Act, 2006.

*Yours faithfully,*

आकाश बा. चव्हाण
अन्न सुरक्षा अधिकारी
अन्न व औषध प्रशासन (म.रा.)
बृहन्मुंबई

Akash Chavan
Food Safety Officer
Food and Drugs Administration, Maharashtra

# STANDARD OPERATING PROCEDURE (SOP) FOR PRODUCTION CATERERS

*Statutory Compliance under Schedule 4, FSSR, 2011*

## 1. Statutory Licensing and Registration

- **Mandatory FSSAI License:** Every caterer operating inside Film City must possess a valid FSSAI Registration or License depending on their annual turnover. A copy of the license must be displayed prominently at the catering site or temporary kitchen.
- **Traceability:** Caterers must source raw materials (milk, meat, grocery, water) only from FSSAI-registered vendors. Bill records, invoices, and supplier credentials must be maintained systematically for inspectoral verification.

## 2. Personal Hygiene of Food Handlers

- **Medical Fitness:** All food handlers, cooks, and servers must possess a valid Medical Fitness Certificate issued by a registered medical practitioner, ensuring they are free from infectious or contagious diseases.
- **Attire and Grooming:** All staff must wear clean overalls, headgear/caps, disposable gloves, and face masks during food preparation and service. Nails must be trimmed, and no jewelry, watches, or loose accessories are permitted during operations.
- **Hand Washing Facilities:** Dedicated hand washing stations equipped with soap, disinfectants, and clean towels must be provisioned at both the preparation area and the service counters.

## 3. Food Preparation & Raw Material Handling

- **Water Quality:** Only potable water conforming to IS 10500 standards shall be used for cooking, washing utensils, and ice preparation. Periodic water testing reports must be available upon request.
- **Cross-Contamination Prevention:** Strict separation must be maintained between raw and cooked food. Separate chopping boards and knives must be used for raw meat/fish and vegetarian/cooked items (Color-coded boards preferred: Green for Veg, Red for Raw Meat). Food preparation must be conducted on raised platforms, never on the bare floor.
- **Thorough Cooking:** Poultry, meat, and eggs must be cooked thoroughly to safe core temperatures. All vegetarian dishes must undergo sufficient thermal processing to ensure complete microbial safety.

## 4. Holding and Serving Temperatures (Critical Control)

- **Hot Holding:** Cooked food intended to be served hot must be held in Bain-maria, chafing dishes, or insulated units maintaining a temperature of not less than 60°C.
- **Cold Holding:** Salads, desserts, curd, and dairy-based dishes must be stored in functional refrigerated units at a temperature below 5°C.

- **The Danger Zone Rule:** Cooked food must not be kept at room temperature (Danger Zone) for more than 2 hours. Food prepared for afternoon shifts must not be extended into night shifts without proper refrigeration and reheating (reheating must rapidly reach a core temperature of 74°C).

### 5. Set-Site Hygiene & Waste Management

- **Pest Control:** The temporary dining/buffet area on the set must be kept free of flies, insects, and rodents. Regular pest control certification of the caterer's base kitchen must be available.
- **Waste Disposal:** Adequate color-coded, foot-operated covered dustbins must be deployed across the catering zone. Food waste must be cleared promptly after every meal shift to avoid attracting pests or creating foul odors.
- **Safe Transportation:** If food is transported from an external base kitchen to the Film City sets, it must be carried in insulated, tightly sealed food-grade containers using clean vehicles dedicated solely to food transit.

> *IMPORTANT NOTE: Routine and surprise inspections will be carried out by the Food Safety Officer at various shooting spots within Goregaon Film City. Any catering unit found violating Schedule 4 norms will face immediate suspension of operations and penal proceedings as authorized under the Food Safety and Standards Act, 2006.*